



आपल्या इच्छेत उदात्तता, कृतीत दिव्यता, हृदयात सात्त्विकता वाढविणे हे लोभ बंधन नष्ट करण्याची मुक्ति आहे.

आपल्याला मुक्त व्हायचे म्हणजे काय? हे प्रथम जाणून घेतले पाहिजे. 'मुक्ति ही बंधन रहित अवस्था असते, त्या ठिकाणी ना कर्माचे बंधन असते ना विकारांचे बधंन'' 'सर्व करून अकर्ता'' ही मनाची अवस्था मुक्तिदायी असते. 'अवघे देणे ईश्वराचे, अवघे करणे ईश्वराचे'' ही भावना अंतरात दृढतम झाल्यावर ममत्व उरत नाही 'मी' उरत नाही. 'माझे' रहात नाही. आणि ही खरी मुक्ति! यासाठी परमेश्वराचे सतत अनुसंधान राखणे महत्त्वाचे आहे. म्हणून समर्थ म्हणतात अखंड हरीचिंतन करावे आणि अन्य सर्व दृश्याचे भानही उरू नये. पण हे कोण शिकणार? 'मुक्तिकांता' ज्यांची अखंड सेवा करते असे हे जाणकार आत्मज्ञानी पुरुष म्हणजे संत-महात्मे होत. त्यांच्या संगतीत राहिल्यावर आत्मज्ञान होऊ शकते. संत मुक्तिचा मार्ग दाखवितात. प्रश्न कसा सोडवावा याची रीत ते सांगतात आणि त्याप्रमाणे वागून 'उत्तर' मात्र आपल्यालाच काढावे लागते. समर्थ रामदास सामान्य माणसाला साधनेचा मार्ग दाखविताना साधना फलित होण्यासाठी पहिले पथ्य म्हणून **'सदा संगती सज्जनांची धरावी'** असे वारंवार सांगतात.

**अहंकार विस्तारला या देह्याचा**
**स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा ।**
**बळे भ्रांति हे जन्मचिंता ठरावी**
**सदा संगती सज्जनांची धरावी ॥ १६६**

विश्वविस्ताराचे कारण 'अहम्' आहे. दृश्याचा पसारा 'अहं' चे विस्तारीत रूप आहे आणि 'दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत' या न्यायाने हे सर्व अनित्य आहे; अशाश्वत आहे, असार आहे; भ्रमरूप आहे; आणि हे खरे असल्याची भ्रांति आपल्याला होते आणि जन्मोजन्मी चिंतेच्या भोवऱ्यात जीव गटांगळ्या खोतो. आणि जन्मचिंता दूर करण्याचा उपाय 'अहं' ला व्यवहाराच्या मर्यादितच राखणे. त्यांचे गुलाम न होणे हा याचाच अर्थ ममत्वाचे आसक्तित रूपांतर होऊन देणे. आसक्ति कोणती असावी व निरासक्ति कशाला म्हणायचे याचे मार्गदर्शन करण्याचा आधिकार संतांचा असतो. म्हणून संतांच्या सहवासात राहून आपले ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण साधायचे असते. त्यासाठीच 'सदा संगती सज्जनांची धरावी' असे समर्थरामदास वारंवार सांगतात.

**बरा निश्चयो शाश्वताचा करावा**
**म्हणे दास संदेह तो विसरावा ।**
**घडीने घडी सार्थकांची करावी**
**सदा संगती सज्जनांची धरावी ॥१६७**

सत्संगातून काय करायचे आणि काय मिळवायचे याचे विवेचन समर्थ वरील श्लोकात करतात.

सार काय, असार काय, नित्य काय, अनित्य काय, शाश्वत कोणते, अशाश्वत कोणते, याचा विवेकाच्या भक्कम आधारावर जाणीवेच्या पातळीवर यथार्थ निवाडा करावा. ही पात्रता अंगी येण्यासाठी 'सत्संग' करावा असे समर्थ रामदास उपदेशितात. नि:संदेहता, निरासक्तता, निर्वासनता, निर्ममत्व, निरहंकारीता, निरपेक्षता, नि:स्वार्थता, नि:ष्कामता, निर्लोभता या शब्दांचे लौकीक आणि पारमार्थिक अर्थ संतच सांगू शकतात कारण 'संत म्हणजे वरील सर्व गुणांचे अधिष्ठान असते. या गुणांचे चालते बोलते प्रकट स्वरूप संत होत.

दासबोधात संत्संगाचे महत्त्व, संतसहवासाचे महत्त्व अनेक ठिकाणी आले आहे. समर्थ रामदांनी पहिल्या नमनाच्या दशकात ५व्या समासात 'संतांची स्तुती' गायिली आहे. त्यावरून ज्यांच्याशी संग करायचा आणि परमार्थाचे ज्ञान मिळवायचे त्या संताचा अधिकार केवढा मोठा आहे हे समजते. समर्थ म्हणतात -

**आता वंदीन सज्जन । जे परमार्थाचे अधिष्ठान**
**जयांचेनि गुह्यम ज्ञान । प्रकटे जनी ॥ (१-५-१ दा.)**

गुह्यतम ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान म्हणजेच आत्मज्ञान हे संतांच्या मुळे कळते किंवा प्रकटते.

**संत आनंदाचे स्थळ । संत सुखचि केवळ**
**नाना संतोषाचे मूळ । ते हे संत ॥**
**संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती**
**नांतरी भक्तिची फलश्रुती । ते हे संत ॥**
**संत धर्माचे धर्मक्षेत्र । संत स्वरुपाचे सत्पात्र**
**नांतरी पुण्याची पवित्र । पुण्यभुमी**
**संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो**
**संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ॥**
**संत समाधीचे मंदीर । संत विवेकाचे भांडार**
**नांतरी बोलिजे माहेर । सयोज्य उक्तीचे ॥** (दा. १-५१६ ते २०)

वरीलप्रमाणे संपूर्ण समासात संतांचे महिमान वर्णन करायचा शाब्दीक प्रयत्न समर्थ करतात. पण शेवटी संत हे ब्रह्मरूप असल्याने जसे ब्रह्माचे वर्णनशब्दांनी करता येत नाही त्याप्रमाणे संताचे महिमान शब्दांनी परीपूर्णतया करता येत नाही. म्हणून समर्थ म्हणतात.



**ऐसी संताची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ।**
**जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ॥ १-५-२६**

समर्थांचे शब्द हे सूत्ररूपआहेत. त्यांच्या प्रत्येक शब्दावर स्वतंत्रपणे लिहिता येईल. परंतु सत्संग महिमा किती अपरिहार्य आहे व तो व्यावहारीक दृष्ट्याही कसा उपयुक्त आहे याचे महत्त्व वाचकांना पटवून देण्याचा हा अल्प प्रयत्न आहे. आधी केले मग सांगितले ॥ असा प्रचीतीचा स्पर्श असलेले समर्थ रामदासांचे हे बोल आपण सर्वांनी हृदयात सतत जपले पाहिजेत. ध्यासातून स्वरूपानुसंधान होत राहिले म्हणजे याचि देही याची डोळा आपणही मुक्तिचा सोहळा पाहू शकू, अनुभवू शकू - यांत शंका नाही.

**संतराम, संतकृष्ण**
**संत ब्रह्म सत्य रे**

**संत हेचि आत्मरूप**
**संत हे स्वरूप रे**

**संत बुद्धि, संतशक्ती**
**संत सत्कृतीचि रे**
**संत भक्ति, संत मुक्ति**
**संत उक्ती सार्थ रे**

**व्हावया आम्हीच संत**
**संत संग नाम रे**
**साधना, उपासना**
**ज्ञान कर्म भक्ती रे**

✿ ✿ ✿

# सत्संग

**पांडुरंगशास्त्री आठवले**

## संत आत्मविश्वास जागृत करतात

खलील जिब्रानची एक गोष्ट आहे. त्याच्या अगदी भले लहान, दहा-बारा ओळी असतील. परंतू अर्थपूर्ण आणि सारगर्भ असतात.

एक अतिशय पवित्र साधुपुरुष बसला होता. एक तरुण त्याच्याजवळ आला. तो अगदी थकला-भागला, जीवनाला कंटाळलेला होता. त्याचे मन मरून गेले होते. काठी टेकीत-टेकीत तिथपर्यंत आला. त्याने त्या साधुपुरुषाला नमस्कार केला. जवळ बसला आणि म्हणाला, ''माझा उद्धार करा. मी पापी आहे.'

साधु म्हणाला, 'मी देखील तुझ्यासारखाच पापी आहे. तो माणूस म्हणाला, ''नाही, नाही, माझ्या पापांची तुम्हाला कल्पना नाही. मी किती ठिकाणी चोऱ्या केल्या आहेत!'

अरे, तू तर माझाच अनुभव सांगत आहेस. साधु उत्तरला. तो माणूस म्हणाला, इतकेच नाही, मी किती लोकांचा काटा काढला आहे! काय सांगू? रात्री झोपेतही त्यांचे आवाज मला ऐकू येतात. माझी झोप उडते! असे! अरे वा! तुझा आणि माझा अनुभव एकसारखाच आहे! साधुने उत्तर दिले.

तो तरुण त्या पापांच्या गोष्ट करी, ते पाप आपणही केले असें साधू म्हणे. शेवटी साधूचे बोलणे ऐकून त्याने क्षणभर विचार केला. इकडे-तिकडे पाहिले. आणि पटकन उभा राहिला. तो थकलेल्या, कंटाळलेल्या अवस्थेत काठी टेकीत आला होता. परंतू त्याने चटकन काही निर्णय घेतला आणि तोंड फिरवून धावत निघून गेला.

तो तरुण गेल्यानंतर जिब्राननें त्या साधुपुरुषाला म्हटले. तुम्ही जीवनात एकही पाप केलेले नाही. मी तुमचे जीवन जवळून पाहिले आहे. असे असूनही तुम्ही असे सांगितलेस? तो पापी जीव आपला उद्धार व्हावा म्हणून तुमच्यावर केवढी श्रद्धा ठेवून तुमच्याकडे आला होता! हे सगळे बोलून तुम्ही तुमच्यावरची त्याची श्रद्धा उडवून दिली.'

साधु म्हणाला, 'माझ्यावरची त्याची श्रद्धा जरुर नष्ट झाली असेल. परंतू इतका पापी जर साधू होऊ शकतो तर मी चांगला होऊ शकणार आहे असे त्याला वाटले आहे म्हणूनच तो धावत गेला. स्वतःवर त्याची श्रद्ध बसली आहे. जर त्याची आत्मश्रद्धा वाढत असेल तर माझ्यावरची श्रद्धा नाहीशी झाली तरी हरकत नाही.

ऋषींनी तेच केले आहे. म्हणून हे (संशोधक) जे संशोधन करतात की, वेदव्यासांनी पाप केले आहे. पराशरांनी केले आहे. ते सत्य वाटत नाही. कारण ऋषी बोलतात व कबूली देतात. स्वतःच लिहीतात, आपण असे केले आहे. सांगण्याचे तात्पर्य हे की, माणसाची आत्मश्रद्धा जागृत करणारा तो संत. तू मायेत पडला आहेस, संसारात पडला आहेस, पापी आहेस, तुझ्याने होणार नाही, असे न सांगता. तू का नाही चांगला होणार? तू वर जाऊ शकतोस. प्रभूच्या मांडीवर बसणे हा तुझा जन्मसिद्ध अधिकार आहे. आणि तू तो मिळविणारच. अशी जिज्ञासा कर. तू करू शकतोस. अशी आत्मश्रद्धा, आत्मशक्ती जागृत कर. असे संत समजावतात. ✿ ✿





# निळा म्हणे साधूसंग । महाभाग्याचे भाग्य

**प्र. दि. कुलकर्णी**

**नगर जिल्ह्यातील संत निळोबाराय हे जगदगुरू तुकाराम महाराज यांचे शिष्य. त्यांनी सुमारे दिडहजार अभंग लिहिलेले आहेत. त्यामध्ये संत संगे निज शांती वाढे ।, संत संगे ज्ञान विरक्ती । असे संतसंगाचे महत्त्व सांगणारे अनेक अभंग आहेत. संत ज्ञानदेव ते संत तुकाराम यांचे अभंग सर्वपरिचित आहेत. संत निळोबांचा वाचकांना परिचय घडावा म्हणून त्यांच्या अभंगवाणी वरील एक लेख –**

**सुसंगती सदा घडो । सुजन वाक्य कानी पडो ।**
**कलंक मतीचा झडो । विषय सर्वथा नावडो ॥**

**या** असामान्य रचनेत मानवी जीवनास योग्य मार्गदर्शन करण्याचे अलौकिक सामर्थ्य आहे. मूलत: मानवी जन्म ही अतिदुर्मिळ गोष्ट आहे. चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यातून फिरत फिरत जीवास मानव देह प्राप्त होतो. त्या देहावर विविध प्रकारचे संस्कार होणे क्रमप्राप्त आहे. हे सारेच संस्कार चांगले असतील असे नव्हे तर काही वाईटही असतील. अर्थात वाईट आहे यास्तव चांगल्यास किंमत आहे तसेच चांगल्यामुळे लोकांना वाईट म्हणजे काय? याची कल्पना येते. जीवास प्राप्त झालेला हा मानवी देह जर संगतीने संस्कारांनी आभूषित केला तर सोन्याला सुगंध प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. ही संगती सजीवाप्रमाणे निर्जीवावर देखील प्रभाव टाकते. फुलांचा सुगंध मातीला तसेच माळेच्या दोऱ्यालादेखील लागतो. संगतीचा प्रभाव प्राण्यावर देखील झालेला असतो.

स्वामी विवेकानंद छाव्याची कथा नेहमी सांगत असत. एक छावा मेंढराच्या कळपात वाढला. संगतीमुळे तो मेंढराप्रमाणेच वर्तन करू लागला. एकदा सिंहाने कळपावर हल्ला केला तेव्हा त्याला छावाहि पळताना दिसला. सिंहाने मेंढरास न पकडता छाव्यास पकडले अन् शांत जलाशयापाशी नेऊन त्यास स्वत:ची जाणीव करून दिली. परिणामी त्याच्यातील सिंहपण जागृत झाले. संगतीचाच परिणाम दुसरे काय? आसन्न मरण असणाऱ्या पोपटाची दोन पिल्ले दोघांनी नेली एक नेले साधूने तर दुसरे नेले डाकूने. संगतीचा प्रभाव दोघांवरहि झाला. साधूच्या संगतीतील पोपट विचारी शांत समजंस, सात्त्विक बनला तर डाकूच्या संगतीतील पोपट त्याच्यासारखाच झाला. संगती संगदोष म्हणतात ते यालाच. संगतीचा प्रभाव वर्णन करताना बैलाविषयी म्हणतात –

**ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला ।**
**वाण नाही पण गुण लागला ॥**





विश्वातील प्राणी/पक्षांवर जर संगतीचा परिणाम होतो तर मानवावर नक्कीच होत असणार या तिळमात्र शंका नाही.

## ॥ गौरव संतसंगाचा ॥

भारतीय संस्कृतीत संतसंगाचा गौरव नेहमी करण्यात आला आहे. वेद,उपनिषद, पुराणे, संत वाङ्मय आदि रचनेतून सत्संगाचा महिमा वर्णन केल्याचे आढळते. मानवास जीवन जगण्यास्तव अन्न, वस्त्र, निवारा यांची नितांत गरज असते. तसेच सत्संगाचीहि गरज असते. वेदादि वाङ्मयाने याचे माहात्म्य वर्णन करताना असे कथन केले आहे की संतसंगामुळे मानवी जीवनांचे सोने होते. जीवनाची धन्यता करून घ्यावयाची असेल तर संतसंग आवश्यकच आहे. मानवास कोणाची संगती लाभली यावर त्याचे जीवन अवलंबून असते. अर्थात संतांचा सहवास प्राप्त झाल्यावरच मानवी जीवन धन्य धन्य होते. वेद, उपनिषदांतील ज्ञान जसे परंपरेने मानवाने जतन केले आहे त्याचप्रमाणे संतसंगाचा कीर्ति सुगंधहि जतन करून ठेवला पाहिजे. समाजाच्या उद्धारास्तव समाजापासून दूर राहून समाजाचे निरिक्षण करून ऋषीमुंनीनी जे विचारधन साठवून ठेवले तेच विचार धनसंतांनी आपल्या अभंगात सामावून घेतले आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत एकनाथ आदि संतांप्रमाणेच आपल्या अभंगरचनेत संत निळोबाराय यांनी संतसंग निरूपण केले आहे. ही संत मंडळी शरीराने जरी भिन्न भिन्न दिसत असली तरी त्यांचे विचार एकसारखेच असतात. असे संतकवि दासगणू महाराज 'श्री गजानन विजय' ग्रंथात म्हणातत.

## संत निळोबाराय महाराज

वारकरी संप्रदायात निळोबारायांचा अधिकार फार मोठा आहे. कीर्तनकारात एक असा अलिखित संकेत आहे की – संत तुकारामाच्या अभंगावर कीर्तन करताना त्यांच्या अभंगावर संत निळोबारायांचाच अभंग घ्यावयाचा. नगर जिल्ह्यातील अश्वी गावी त्यांचा जन्म झाला. पंढरीस यात्रेनिमित्त गेल्यावर त्यांची संत तुकारामांचे पुत्र नारायणबुवा यांची भेट झाली. संत तुकारामांच्या भेटीस्तव त्यांनी देहू गावी ४२ दिवस प्रयोपवेशन केले. अखेरीस संत तुकारामांनी त्यांना अनुग्रह दिला. साक्षात्कारानंतर त्यांनी सुमारे १५ ते १६ शे अभंगांची रचना केली. श्री नानामहाराज साखरे संपादित आवृतीत ही संख्या १५६४ असून त्याशिवाय विविध आरत्या, तुकाराम स्तुति अशी विपुल रचना आहे. त्यांच्या अभंगातून आपणास संतसंग महिमा वर्णन केलेला आढळतो. परिसांच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते पण परिसाला लोखंडाचा परिस करण्याचे सामर्थ्य नाही. मानवी जीवनात संतसंग घडल्यास त्या जीवनाचे सोने होते. याला मूळ प्रयोजन असे की; संतसंग हाच मुळी सुवर्ण आहे. प्रस्तुत लेखात संत निळोबाराय यांच्या अभंग वाङ्मयातील संतसंगाविषयीची माहिती घेण्याचा प्रयत्न करू.

## ॥ निळोबाकृत संतसंग विवरण ॥

महान साक्षात्कारी संत निळोबाराय पिंपळनेरकर यांचे संतसंग विषयीचे अभंग म्हणजे वै. ह.भ.प. ल. रा. पांगारकर यांच्या शब्दात 'ते मथुरेचे ताजे पेढे आहेत' याला प्रयोजन असे की; संतांच्या संगतीने वाल्याचा वाल्मिकी होतो तर नराचा नारायण झालाच पाहिजे. अशी खूणगाठ मनाशीं बांधूनच संत निळोबारायांनी संतसंग हा विषय आपल्या अभंगात घेतला आहे.

संतसंगाचा महिमा वर्णन करताना आपल्या ५२६ व्या अभंगात निळोबाराय सांगतात, संतांच्या सहवासाने वेडा वेद म्हणून शकतो, अचेतन असणारी भिंत चालू शकते, मेले प्राणी जीवंत होऊ शकतात, अग्नि शांतपणा धारण करू शकतो, विश्वात जेजे सहजी अवघड, अशक्य आहे ते केवळ संत सहवासामुळेच होवू शकते. याचे प्रयोजन वर्णन करताना ५२९ व्या अभंगात ते सांगतात –

**त्याचे नवल कोण तारिती जडजीवा ।**
**यालागी घडावा संत संग ॥**

कोणत्याही संतांच्या सहवासात गेल्यावर मानवाच्या चित्तवृत्तीत आमूलाग्र बदलच होतो. याचे विवेचन करताना ते म्हणतात – मूलत: संत हे जीवनमुक्त असतात. त्यांच्या सहवासात जो येईल त्यालाच संतांचा महिमा कळतो. स्थल,काल, वेळ निरपेक्ष असे हरिनाम त्यांच्या मुखाने सतत सुरू असते. साधक त्यांच्या संगतीत जाताच तोहि त्या संतांप्रमाणेच 'मानामान न मानता । हरिकीर्तनी रंगती'' तसेच परिणामी साधकास वाटते '' **न पडे विसर नामाचा** ''

संतांचे ठायी दया, क्षमा, शांति यांची वस्ती असते. त्यांनी कामाक्रोधादि षडरिपूवर विजय प्राप्त केलेला असतो. त्यांचे सारे आशापाश तुटलेले असतात. त्यांच्या अंगी नम्रता आलेली असते. त्यांच्या मनात भूतदया अखंड वसत असते. समाजातील सर्वांच्या उद्धारास्तव ते सतत झटत असतात. यांसारखे गणु त्यांच्या अंगी असतात. हे जरी सत्य असले तरी त्यांच्या सहवासात गेल्याशिवाय त्याचे मोल कळत नाही. यास्तव ५४८ व्या अभंगात निळोबा लिहीतात–





**जिही धरिला संतसंग । दुराविले त्रिविध जग ।**
**तया सखा पांडुरंग । निजानुभवे जोडला ॥**

दैनंदिन व्यवहारात वागताना संत हे सहजी वर्तणूक करीत असतात. त्यांच्या सहवासात जो येतो त्याला करिती तात्काळ आपणासारिखे' हे जसे सत्य आहे तसेच त्यांचा 'विषय नारायणच' झालेला असतो. हाच विचार अभंग रूपाने मांडताना ते ५७६ व्या अभंगात म्हणतात -

**रंगले ते संतसंगे । झाले अंगे शुद्ध बुद्ध ।**
**देवचि संत देवचि संत । आणिक काही करीत देवचि ते ॥**

महापुरुष हे नेहमी ब्रह्मानंदी लीन होऊन डुलत असतात. अशा महापुरुषाची कृपा ज्यावर होते. तो सर्व सुखांनी संतुष्ट होतो. वृक्ष जसे वृक्ष लावणाऱ्यास, तोडणाऱ्यास सावली देतात तसेच संत पापी, दुर्जन, दुर्जन यांनाहि उद्धारतात. असे कित्येक पापी त्यांनी आतापर्यंत तारले, पुढेही तारतील यात शंका नाही. याला काय निमित्त असावे हे कथन करताना निळोबाराय म्हणताता - संत हे मुळातच कृपावंत असतात. ते केवळ परमेश्वराशी संवाद करीत असतात. तसेच नामस्मरणाशिवाय ते कधीच राहत नाहीत. समाजातील सर्वांविषयी त्यांच्या मनात दया असल्याने तसेच ते नित्य विरागी वृत्तीने वावरत असल्याने जो जो त्यांच्या संगतीत येईल तो तो त्यांच्यासारखाच होईल. हा बदल वर्णन करताना ५९५ अभंगात ते साधकांना सांगतात-

**संतसंगे वैराग्य घडे । संतसंगे विरक्ती जोडे ।**
**संतसंगे निजशांति वाढे । साधन हृदयी अखंडित ।**
**संतसंगे हरिची भक्ती । संतसंगे ज्ञान विरक्ती ।**
**संतसंगे भक्ती मुक्ती । साधका वरिती अनायासे ।**
**निळा म्हणे साधुसंग । महाभाग्याचे हे भाग्य**
**सेविती ते स्वरुप चांग । पावती आत्मया श्रीहरीचे ॥**

संतांचे ठायी इतके वैराग्य वसलेले असते की; विश्वातील सर्वच भोग त्यांना तुच्छ वाटावयास लागतात. संत तुकाराम महाराज म्हणतात - सोने रुपे आम्हा । मृत्तिकेसमान. परमात्म्याच्या चिंतनात त्यांचे मन सदैव रंगलेले असते. त्यांच्या सहवासात येण्यास्तव साक्षात् परमेश्वरही आतुर असतो. तेथे मानवाची काय कथा? अशा सज्जनांचा संग लाभणे हे निळोबारायांच्या मतानुसार 'भाग्य जोडे संत संगती' निळा म्हणे संतसंग । देवा भाग्य दुर्लभ तो' असेच आहे.

**भावभक्ति भाग्यवंत । त्या भेटती संत ॥**

संतसंगतीचा लाभ अवर्णनीय असतो. ज्याला सज्जनांचा सहवास घडतो त्याचे 'कुल पावन होते' तसेच तोहि भाग्यवंत असलाच पाहिजे. अशा निळोबांचा दावा आहे. सज्जनांची संगती लाभल्यास अष्टसिद्धी साधकाच्या दासी बनतात. पारमार्थिक सारी संपत्ती आपोआप त्यांच्यासमोर धावत येते. परिणामी मानवी जीवन सफल होते. यास्तव आपला विचार पुढे व्यक्त करताना ६०८ व्या अभंगात ते सांगतात - ऐसी जोडलिया सत्संगती । परम विश्रांती भाविका संतांच्या सहवासाने साधक उद्धारतात असे नव्हे तर महापापी, महादुर्जनही केवळ त्यांच्या दर्शनाने उद्धारून जातात. याचे वर्णन करताना ६२९ अभंगात निळोबा म्हणतात - अलभ्य लाभ ते सत्संगती । घरासीचि येती चोजवित. त्याचप्रमाणे ६३३ व्या अभंगात ते कथन करतात -

**निळा म्हणे वाढे भाव । संचरे स्वानुभव निजांगी ।**

संत सहवासाचा महिमा वर्णन करताना संतकवि निळोबाराय म्हणतात - ज्याला संतसंग प्राप्त झाला ''काय महिमा त्याचा वाणू'' ते म्हणतात संतांच्या सहवासात मानवाची सारी सारी पाप कापूरासारखी, नष्ट होतात. त्यांच्या संगतीने मानव सर्व कार्ये ईश्वरार्पण बुद्धीने करतो. सज्जनांची सोबत ज्यास आहे त्याचे मन परमार्थाशिवाय अन्यत्र रमत नाही.

**काय उणे सुखा मग । संतसंग जोडता ।**
**निळा म्हणे संतापाशी । आहे अनायासि सर्व सिद्धी ॥**

असेही एका अभंगात निळोबाराय म्हणतात.संत तुकाराम महाराजांनीसुद्धा सत्संगाचे महत्त्व वर्णन केले आहे. संत, सज्जन, सत्पुरुष यांचा सहवास लाभणे ही पूर्वजन्माची पुण्याई आहे. त्यांच्या सहवासात राहिल्यास मानप्रवास मुक्ति मिळते. नेमका तोच धागा पकडून निळोबाराय आपल्या ६३८, ६३९,६४० अभंगात म्हणतात - संतांच्या संगतीत राहून जो कोणी परमेश्वराचे नामस्मरण करील त्याचा धाक यमासहि वाटेल. याशिवाय साधक स्वत: तर तरेलच शिवाय त्या साधकाच्या कित्येक पिढ्याहि उद्धारून जातील. संत हरिनामी नित्य दंग असल्याने परमेश्वर जसा त्यांच्याशी संवाद करावयास उत्सुक असतो तसेच त्याच्या संगतीत असणाऱ्यांनी जर हरिनाम घेतले तर तो परमात्मा त्याच्याशीहि हितगुज करावयास समोर आल्याखेरीज राहणार नाही.





संतापाशी सर्व प्रकारचे सुख अपरंपार असते. त्यांच्या संगतीत रमणे पुरातन अशा मानवी हिताच्या वाटा प्राप्त झाल्यासारखेच आहे. परब्रह्माविषयी ज्ञान सर्वांना देणे हा संतांचा व्यवसाय असतो. त्यांच्या संगतीत गेल्यास हा लाभ साधकास मिळतोच. हातचे काहीही न ठेवता ते साधकास सारे देतात. संतांच्या सहवासात ज्ञान, कर्म, भक्ति यांची सांगोपांग माहिती मिळते. प्रेमचंद नामक हिन्दी कथाकार अेके ठिकाणी असे लिहीतात की -

**'हर घर के द्वारपर ऐक संत खडा है । कम उन हाथोंकी है, जिनमे ओ आपली भेट ले सके ।'** अशाच प्रकारच्या आशय निळोबारायांनी ६६९ अभंगात दिला आहे.

संतांच्या सहवासात जनावरेदेखील आश्चर्यवत वागतात. शेगावचे संत गजानन महाराज यांच्या संगतीत उनाड गाय एकदम शांत झाल्याचे वर्णन श्री गजाननविजय ग्रंथात संतकवि दासगणूंनी केले आहे. तोच लाभ वर्णन करताना ७०४ अभंगात निळोबाराय सांगतात, संतसंगाचा वेळ कधीहि वाया जात नाही. त्यामुळे मानवास ८४ लक्ष योनीचा फेरा चुकविता येतो. परिणामी त्यास मुक्ति मिळते. वास्तव संगती महत्त्वाची आणि तीहि जर संतांची असेल तर विचारता सोय नाही. आपल्या ७०१ अभंगात निळोबा लिहितात -

**उत्तम संचित होते गांठी । तेणेचि या भेटी संतासवे ।**
**सुकृतासी आले फळ । भावबळे लगटोनी ।**
**त्याच्या भाग्या आले भाग्य । लाधले संतसंगाचा ।**
**निळा म्हणे पूर्ण ते आले । जिही या सेविले संतचरणा ।**

सर्व प्रकारच्या ऐहिक सुखास्तव मानव सातत्याने धडपडत असतो. ते सुख विविध प्रकाराने प्राप्त होणे शक्य आहे पण पारमार्थिक सुखास्तव मात्र केवळ संतसंगच कारणीभूत असतो. संत स्वमुखाने हरिनाम घेतात. हरिकथा वर्णन करतात. याचा परिणाम त्यांच्या सहवासात येणाऱ्यावर काय होतो ? हे कथन करतांना ७०३ अभंगात निळोबाराय म्हणतात -

**आजि संतसंग गुणे हरिची नामे उच्चारणे ।**
**अनायासेचि कथा कीर्ति । जोडली याचि संगती ।**

संतांच्या सहवासात गेल्यावर साधक अंतर्बाह्य पूर्णपणे बदलून जातो. संतांचा ध्येय विषय पंढरीचा पंढरीनाथ आहे. त्यांच्या भक्तांची मांदियाळी वर्षातून किमान चारमोठ्या वारीस पंढरीत जमते. संतासमवेत साधक ऐकदा जरी वारीस गेला तरी तेथून तो पुढे नित्य एकादशीस पंढरीस जातोच. परिणामी स्वत:चा उद्धार करून घेतो. प्रत्यक्ष परमेश्वरासदेखील दुर्लभ असणारा हा सोहळा साधक यांचि देहि, याचि डोळा, अनुभवतो. याचे वर्णन करताना निळोबा आपल्या ७२७ व्या अभंगात म्हणतात -


**प्रतिवर्षी पंढरपुरा जाती । महाद्वारा हरिभेटी ।**
**भेटी त्याची इच्छि मन । करिती कीर्तन अनुदिनी ।**

संतसंगाचा महिमा वर्णन करताना संतकवि निळोबारायांनी आपली काव्यप्रतिभा संतापायीच अर्पण केली आहे. संतसंगतीचा साधकास होणारा लाभ वर्णन करताना ७२८ व्या अभंगात ते लिहीतात -

**टाळ विणे मृदंगेसी । येती गजरेसी मिरवत ।**
**छबिने पताका गरूड टके । घेऊनि हरखे विलोकिती ।**
**म्हणती जन्म सुफल झाला । आजी देखिला परात्पर ।**
**निळा म्हणजे विठ्ठल हरी । लेवुनि अंतरी सुखावती ।।**

सर्वच संताप्रमाणे संतकवि निळोबारायांनी संतसंग महिमा आपल्या अभंगात ग्रंथित केला आहे. संतवाङ्मय हे खरोखरच मानवास, साधकास प्राप्त झालेले घबाड आहे. आजच्या धकाधकीच्या, ताणतणावाच्या वातावरणात हे संतवाङ्मय दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे. वास्तव मानवाने संतवाङ्मय अवश्य वाचले पाहिजे. त्यातील आशय गर्भ विचारांचे चिंतन अन् मनन केले पाहिजे. परिणामी तो मुक्त होऊन जन्म मरणाच्या फेऱ्यातून लिलया जीवन सार्थकी लावू शकेल. केवळ संतकवि निळोबाराय पिंपळनेरकर यांनीच नव्हे तर सर्व संतांनी निर्माण केलेले वाङ्मय नित्य वाचनात ठेवले पाहिजे. संतसंग हा तसा व्यापक विषय आहे. तरीहि श्री साईलीला या नियतकालिकाने हे अजरामर विचारधन ऐकत्रित करून साधकांना उपलब्ध करून दिले आहे. त्याचा लाभ प्रत्येकाने घेऊन कृतकृत्य व्हावे हीच मनोकामना.

✿ ✿ ✿





# शैव साहित्यातील संतसंग महती

डॉ. ग. वा. तगारे

**कोणताही धर्म असो वा त्यातील कोणताही पंथ-संप्रदाय असो त्यामध्ये संतसंग महती अनिवार्यपणे आढळते. डॉ. तगारे हे शैवसाहित्याचे महाराष्ट्रातील एक मान्यवर संशोधक-अभ्यासक आणि विचारवंत आहेत. शैवसाहित्याचा जणू ते ज्ञानकोशच आहेत.**

**शैवसाहित्यात-वीरशैवविचारधारेत संत संगाचे स्वरूप व संतसंग महतीबद्दल त्यांनी अत्यंत थोडक्यात लिहिलेला हा लेख चिंतनशिल वाचकांना अभ्यासकवाचकांना विशेष आवडेल असे वाटते.**

## शैव संकल्पना

**या** विश्वाला आधारभूत असलेले एक अंतिम परतत्त्व आहे. ते विश्वव्यापी (immanent) आणि विश्वोत्तर (Transeendent) आहे. ते सर्वजग व्यापून उरले आहे. ते विश्वापेक्षाही व्यापक असल्यामुळे जगाची उत्पत्ती, स्थिती आणि लक्ष त्याच्यामध्येच होतात. अशा तत्त्वाला भाषेच्या सोयीसाठी जे 'शिव' (कल्याणप्रद शुभ) अशी संज्ञा वापरतात ते "**शैव**", आणि या तत्त्वाला 'विष्णु' (सर्वव्यापी) अशी संज्ञा वापरतात ते '**वैष्णव**'

हे शैव-वैष्णवांचे ऐक्यात्म एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. हे शैव किंवा वैष्णव आचार्य, 'देव (शिवविष्णू), मानव आणि जग यांचा परस्पर संबंधांचा विचार मांडतात. तेव्हा त्यांच्या विचारधाराही पुष्कळशा समान असतात. तत्त्वज्ञानाचे दृष्टीने त्यांना स्थूल मानाने "द्वैत", "अद्वैत", "विशिष्टाद्वैत" इ. संज्ञा दिल्या जातात.

ही शैव-वैष्णवांची आंतरिक एकता आवर्जून मांडण्याचे कारण २१ वे शतक आले तरी "शैव" "वैष्णव" समाज परस्परांचे ऐक्य समजुन न घेता भेदावर भर देतात. असा अनुभव आहे. पद्मपुराणात म्हटले आहे.

**शैवं च वैष्णवं लोकमेकरूपं नरोत्तम ।**
**द्वयोश्चाप्यन्तरं नास्ति एकरूपं महात्मनो: ॥**

**भावार्थ :** शैव आणि वैष्णव एकरूप आहेत त्यामध्ये भेद करू नये. मराठी संतांची प्रथमपासून '**हरी-हरा मानू नये भेद**' अशीच भूमिका आहे.

"शैव साहित्य" हा विषय दिल्यामुळे त्या मर्यादित मी लिहित आहे. माझ्या वाचकांप्रमाणे माझी ही श्रद्धा आहे की :

**शिवस्य हृदये विष्णुर्विष्णोश्च हृदये शिव:.**

## शैव-साहित्य-व्याप्ती

'शिव-रुद्राच्या' ऋग्वेदातील उल्लेखावरून शिवोपासना प्राचीन आहे हे स्पष्ट आहे. त्याचा अर्थ ऋग्वेद' हा शैव साहित्याचा भाग होत नाही. पण उपनिषत्कालामध्ये काही उपनिषदे शिवपर असल्यामुळे त्यांचा 'शैव साहित्यात अंतर्भाव करण्यास हरकत नसावी. उदाहरणार्थ श्वेताश्वतर उपनिषद म्हणजे -

**एको हि रुद्रो द्वितीयाय तस्थु: ।**
**य इमाँ ल्लोकानीक्षत इशनीभि: ।।**

३.२ (तिसरा अध्याय दुसरा मंत्र)

अशी शिव-रुद्रविषयक उपनिषदे शैव-साहित्यात येतात. रामायण आणि महाभारत या इतिहास ग्रंथात इतके शिवमहात्म्य आहे की त्यातील शिव-विषयक साहित्य ''शैव'' मानावे लागेल का कुणास ठाऊक पण परंपरेने पुराणांची 'शैव' आणि 'वैष्णव' अशी विभागणी केली आहे. पण या 'सात्त्विक', 'राजस', 'तामस' या गरुडादि पुराणांनी केलेली वर्गीकरणे वास्तवाला किती तरी सोडून आहेत: शैव (उदा. स्कंद, वायु) पुराणात विष्णुवर्णने आहेत. त्यामुळे तथाकथित 'तामस' किंवा ''शैव'' ''पुराणे'' ''शैव साहित्यात'' अंतर्भूत करावीत हवे तर.

पण त्या सर्वापेक्षा द्वैती, अद्वैती, विशिष्ठ द्वैती द्वैताद्वैती जे शैव सांप्रदाय रूढ आहेत त्यांचे ग्रंथ निश्चितच ''शैव साहित्याचा'' भाग मानावे लागतील. संस्कृत पुरते मर्यादित बोलावयाचे झाले तर 'शैव-साहित्य' अफाट आहे. सूत्रग्रंथ, टीका, अनुटीका, स्वतंत्र प्रबंध इ. ची संख्या शेकड्यांनी मोजावी लागेल.

शैवसांप्रदायांच्या ग्रंथांना शैव साहित्य निश्चितपणे म्हणता येत असल्यामुळे त्यांच्यापुरती मर्यादित संक्षिप्त चर्चा करीत आहे.

## शैव संप्रदाय-भक्तिप्रधान

तैत्तिरीय आरण्यकावर आधारलेल्या प्राचीन पाशुपत संप्रदायापासून तुलना अर्वाचीन काळातील वीरशैव संप्रदाय घेतले तर वैराग्य, ज्ञान आणि भक्ती ही त्या सर्वांची समान वैशिष्ट्ये आढळतात. पण मला येथे 'शिवसाहित्यातील सत्संग महती' यावर लिहावयाचे असल्यामुळे या सांप्रदायातील भक्तिमार्गात सत्संगाला किती महत्त्व दिले आहे त्याचे दिग्दर्शन करावयाचे आहे. सत्संग' म्हणजे 'संताची संगती' असा मी अर्थ मानतो.

खरा संत हा परमेश्वराचा (शिवाचा) प्रगत भक्त असतो आणि पारमार्थिक मार्गदर्शन करणारा गुरू यांचे संतत्त्व गृहीत धरलेले असते. तेव्हा संतांची संगती, सेवा, पूजा, किंवा आराधना याबद्दलची सांप्रदायाची मते अशी आहेत: या सांप्रदायांपैकी पाशुपतसंप्रदाय हा त्रैवर्णिकासाठी असल्याने व 'पाशुपत-सूत्र' हा सूत्रमय ग्रंथात 'गुरूंची सेवा' एवढाच उल्लेख आहे. त्याचा अर्थ 'संत्संग-महात्म्य' असा करण्यास अडचण नसावी. काश्मिरी शैवमत (ईश्वराद्वयवाद) याचा आकर ग्रंथ 'शिवसूत्र' यात गुरुसेवा सांगितली आहे.

## सिद्धान्त शैव मत

हे मत द्वैती असले तरी ब्राह्मण अब्राह्मण सर्व समाजाला सामावून घेणारे आहे. या मताचे कित्येक आचार्य व संत अब्राह्मण होते. तामिळनाडू हा या शैव मताचा बाले किल्ला आहे. या मतांचे समालोचन, तत्त्वज्ञान, संस्थापक, संत इ. माहिती मी माझ्या 'शैवदर्शन'' या पुस्तकात दिलेली असली (पृ १२५-१५६) तरी या ठिकाणी सत्संगापूरते उल्लेख घेतो.

सिद्धान्त शैव मतात 'मोक्षमार्ग' म्हणून चार मार्गांचे वर्णन आहे ते असे :-

**(१) दासमार्ग (२) सत्पुत्रमार्ग (३) सखामार्ग**
**(४) सत (ज्ञान) मार्ग**

दासमार्ग म्हणजे जे शिवभक्त किंवा शिवयोगी असतील त्यांची सेवा, शुश्रूषा, व्यवस्था करणे. शिव-लिंगपूजनाइतके संत सेवेला आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या सत्संगाला महत्त्व आहे.

सखामार्ग म्हणजे नवविधा भक्तितील 'सख्य भक्ती'

## शैव विशिष्ठाद्वैत

चित् (चैतन्ययुक्त जीव), अचित (जड, जगत) हे दोन्ही ईश्वराचे अंगभूत आहेत असे चित् आणि अचित् यांचे द्वैत सामावून घेणारे 'विशिष्ठ'' प्रकारचे. अद्वैत म्हणजे 'विशिष्ट द्वैता' समानुजानी ब्रह्मसुत्रावरील 'श्रीभाष्यात' या मताची प्रस्थापना करताना उपनिषदांचे ब्रह्मसूत्रात आलेले तत्त्वज्ञान आणि वैष्णव आगीमधील तत्त्वज्ञान यांचा मेळ घालून दाखवला. वैष्णव सांप्रदायासंबंधी जे कार्य रामानुजानी केले

तसेच कार्यकर्त्यांचे (बहुधा) समकालीन श्रीकष्ठाचार्यांनी ब्रह्मसुत्रावर 'ब्रह्ममीमांसाभाष्य' म्हणून एक सखोल टीका लिहून वेदान्त आणि शैव आगम यांचा समन्वय करून दाखविला आहे. आणि त्यांनी रामानुजाप्रमाणे 'शैव' विशिष्टाद्वैताची' स्थापना केली.मोक्षाची किंवा शिवाची प्राप्ती होण्यासाठी त्यांनी 'श्रवण, मनन इ. नी विनिश्चित केलेल्या भक्ति-ज्ञान-मार्गाने स्वत: परब्रह्म असलेल्या शिवाच्या कृपाप्रसादाने मोक्षलक्ष्मीची प्राप्ती होते'' असे मार्गदर्शन केले आहे.

तत्र श्रवण-मननादि निश्चितस्य --- भक्तिज्ञान
विशेषाभिमुखस्य ---- शिवस्य परब्रह्मण:
प्रसादार्तिशयेन ---- कैवप्प लक्ष्मी प्रयोजनं --- भवति ।

**(ब्रह्ममीमांसा भाष्य खंड १.९१-९५)**

## वीरशैवमत-द्वैताद्वैती

वरील उताऱ्यात भक्तीमध्ये सत्संगाचा अंतर्भाव होतो हे स्पष्ट आहे. पण सत्संगाविषयी त्याहून अधिक स्पष्ट उल्लेख ''वीरशैव'' या द्वैताद्वैती' शैवमतात आढळतात.

समुद्राला मिळण्यापूर्वी नदी निराळी असते आणि समुद्र निराळा असतो. नदी आणि समुद्र यात द्वैत असते. पण नदी समुद्राला मिळाला की द्वैत संपते आणि दोघात अद्वैत निर्माण होते. त्याप्रमाणे जीवात्मा (शरण) आणि शिव (शरण्य) प्रथम भिन्न असतात. त्यांच्यांत द्वैत असते. पण मोक्ष या अवस्थेत जीव आणि शिव (शरण आणि शरण्य) एकरूप होतात त्यांच्यात अद्वैत निर्माण होते. वीरशैव सांप्रदायाचे हे मुख्य तत्त्वज्ञान असल्यामुळे त्याला ''**द्वैताद्वैती**'' असे म्हणतात.

या वीरशैव मताचा शिवयोगी शिवाचार्य कृत 'सिद्धान्तशिखामणी' या प्रसिद्ध ग्रंथाद्वारे मी विवेचन करीत आहे.

वीरशैवमतात 'जीवात्मा हा शिवाय एकरूप होण्यापूर्वी सहा अवस्थेतून जातो. त्याला ते 'षट्स्थळ' असे म्हणतात. यापैकी पहिले स्थळ म्हणजे 'भक्तस्थळ'. सिद्धान्त शिखामणी मधील (नवम परिच्छेद) विवेचनाचे आधारे मी लिहित आहे. कंसातील आकडे श्लोकांचे आहेत. ''लिंगधारण करून पंचाक्षरी (शिवाय नम:) जप करणारा योगी 'शिवभक्त' होय (१) अशा शिवभक्ताला शंभूने (शिवाने) श्रवण, कीर्तन इ. नवविधा भक्ति सांगितली आहे (२,३) भक्तिमार्गात सत्संग आपोआपच येतो. ही भक्ती शिवाच्याच प्रसादाने-कृपेने निर्माण होते. (११) गुरूकडून लिंगधारण पूर्वकदीक्षा घेतल्यानंतर तो 'भक्त होतो. (गुरू हे श्रेष्ठसंत असतात. त्यांच्याकडून दीक्षा त्यांची सेवा हा सत्संगाचा भाग आहे) जशी आपण शिवाची पूजा करतो तशी रोज गुरूचीही करावी (५२)

**यथा देवे जगन्नाथे --- तथा गुरूवरे कुर्याद**
**उपचारान दिनेदिने ॥ (५२)**

ज्यांनी शिवभक्तिला जीवन वाहिले ते 'जंगम' हे चालणारे-मूर्तिमंत शिवच आहेत. ज्याप्रमाणे गुरू किंवा लिंग यांची भक्ती करतो तशी जंगमाचीही भक्ती करावी.

**यथा गुरौ यथा लिंगे भक्तिमान परिवर्तते ।**
**जङ्गमे (जंगमे)च तथा नित्यं भक्ति कुर्याद विचक्षण: ॥ (९.५८)**

कारण हा शिवयोगी (जंगम) साक्षात शिवच आहे.

**शिवयोगी शिव: साक्षादिती कैंकर्यभक्तित : ।**
**पूजयेदारेणैव यथा लिङ्ग यथा गुरू : ॥ ४-६६**

ही सत्संगच्या महतीची परमावधी आहे.

द्वैताद्वैतादि शैवसांप्रदयांचे साहित्य म्हणजे निर्विवाद शैवसाहित्य असल्यामुळे मी त्याचे संक्षिप्त दिग्दर्शन केले. पुराणसाहित्य अर्वाचीन भाषातील साहित्य यांचा परामर्श घेण्यासाठी एक मोठा ग्रंथ लिहावा लागेल.

भिन्न भिन्न तत्त्वज्ञान मानणारे शैवसांप्रदाय भक्तिमार्ग व तदनुषंगिक गुरू आणि संत यांच्याबद्दल किती कमालीचा आदर मानत याचे हे किंचित दर्शन.

✿ ✿ ✿

## दांभिकांचा संग करू नका

**सर्वभूती एक ईश्वर मानणारे आणि कृतीने काही लोकांना पशूतुल्य लेखणारे लोक दांभिक आहेत त्यांचा संग धरू नका.**

**मुंग्यांना साखर घालणारे व कृतीने काही माणसांना पाण्यावाचून मारणारे लोक दांभिक आहेत त्यांचा संग करू नका.**

**- बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**



# झाल्या संतांचे दर्शन । साक्षात भेटे नारायण ॥

डॉ. ग. प्र. परांजपे

**खुद्द परमेश्वर व संत असे एकाच वेळी दोघे माझे पुढे प्रकट झाले तर मी प्रथम संतांचे चरण वंदन करीन असे महात्मा कबीर यांचे वचन असून त्याद्वारे संतांचे व संत संगाचे महत्त्व लक्षात येण्यासारखे आहे. या दृष्टीने संतकवि दासगणू यांचे 'झाल्या संतांचे दर्शन। साक्षात भेटे नारायण।' वचनही चिंतनिय आहे. डॉ. परांजपे यांनी एका वेगळ्या पद्धतीने पटवून दिलेल संतसंगाचे महत्त्व.**

**घडो मजशि संगती सतत सज्जनांची हरी ।**
**जडो मन पदी पडो तव कथाहि कानावरी ॥**
**असोच रसना सदा रत तुझ्या सुनामामृती ।**
**करोत कर सर्वदा भजन हे तुझे निश्चिती ॥**

परम सद्गुरु श्री दासगणू महारांनी या श्लोकात देवाजवळ प्रारंभीच सत्संगाची मागणी केली आहे. सत्संगाची महती फार मोठी आहे. भागवतकारांनीही सुस्पष्टपणे सत्संगाला दुर्लभ गोष्टीत समाविष्ट केलेले आहे.

**दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रह हेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रय: ॥**

अर्थात सज्जन-संतसंगती ही दुर्लभ आहे. येथे ही त्यांनी चढता क्रम सांगितल्याचे दिसून येते. आधी मनुष्यत्व दुर्लभ, त्यापेक्षा मुमुक्षुत्व असणं दुर्मिळ आणि महापुरुषसंश्रय म्हणजेच संतसंगती सर्वात जास्त दुर्लभ ! अशी दुर्लभ गोष्ट जर प्राप्त झाली तर त्यापरते भाग्य नाही. कारण संतांची संगती हाच आत्मोद्धारचा खरे माध्यम, खरे साधन आहे. '**परमेश्वर**' आणि '**सद्गुरू-संत**' माझ्या पुढे दोघे उभे राहिले तर कबीर म्हणतात मी संतांचे-गुरुचे पाय आधी धरीन कारण परमेशाची ओळख संतांच्यामुळेच होत असते. श्री. दासगणूंनीही या माध्यमांसबंधी लिहिलंय की '**तुझ्या प्राप्तीचे साधन। झाल्या संतांचे दर्शन । साक्षात भेटे नारायण ।**' एवढेच काय '**चित्ताप्रति समाधान। संतदर्शने करून । बुद्धीलाही स्थिरपण । येते संत कृपेने ।**' प्रतिष्ठित प्रज्ञेच्या बळावर ईश्वरप्राप्ती असा प्रकार गीतेनेही वर्णिला आहे. म्हणजेच ईश्वर दर्शनाचे सुलभ साधन संत-संतसंगती ठरते.

ज्याचे दर्शन घेण्याविषयी हे सर्वोत्तम साधन उल्लेखिले तो ईश्वर तरी कसा? ईश्वरीतत्त्व गुढ आहे. उपनिषद्कारांनी त्याचे वर्णन करताना 'ते सूक्ष्मही आहे, स्थूलही आहे; वर आहे, खाली आहे; आतही आहे, बाहेरही आहे इ. इ. म्हटलेले आहे. अर्थात, चराचरात ते तत्त्व व्यापून राहिलं आहे. मोरोपंत म्हणतात, 'स्थिरचर व्यापुनि अवघा तो जगदात्मा दशांगुळे उरला' उपनिषदांचाच हा अनुवाद आहे.

**'यच्च किंचित् जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपिवा,**
**अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थित : ॥**

अशा या तत्त्वाचे दर्शन घडविणार कसे? एका परंपराप्राप्त जुन्या पदात म्हटलंय, 'कसं बोटानं दाखवु तुला, बघ अनुभव गुरुच्या मुला' या तत्त्वाचे स्पष्टीकरण करताना गीतेनेही म्हटले आहे की 'इंद्रियाचे पलीकडे मन आहे, मनाच्या पलीकडे बुद्धी आणि बुद्धीच्याही पलीकडे तो आहे' त्यामुळे हे तत्त्व इंद्रिय-मन-बुद्धिच्या पातळीवर समजणे अवघड आहे. ते निगूढ तत्त्व शोधून काढणे ही गोष्ट अपरिहार्य ठरते. संतांनी ही संशोधन प्रक्रिया पूर्ण केलेली आहे-असते. त्यामुळे ते ठासून म्हणतात,

**'देखिला देखिला माय देवाचाही देव ।'**
**'योगिया दुर्लभ तो म्या देखिला साजणी'**

हा शोध महत्त्वाचा. कार्य दिसते कारण दिसतेच असे नाही. कार्यामागचे कारण शोधण्याची जिज्ञासा फक्त मानवालाच प्राप्त आहे. इतर प्राण्यांना नाही. असं म्हणतात, की ही बुद्धी मानवाला दिली आणि विश्वनिर्माता ब्रह्मदेव आनंदित झाला. ही जिज्ञासाबुद्धीच शास्त्रकारांनी 'ब्रह्मवलोकधिषण' बुद्धी म्हणून उल्लेखिली आहे. या जिज्ञासेच्या बळावरच माणसाने असंख्य शास्त्रे बनविली. तत्त्वज्ञाने निर्माण केली. **विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये असंख्य संशोधने झाली. केवळ भौतिकाच्या दिशेने असा प्रयत्न करणारे शास्त्रज्ञ ठरतात तर अध्यात्माच्या दिशेने प्रयत्न करणारे संत ठरतात.** संशोधन भौतिकाच्या दिशेने झाले की सुखाची साधने निर्माण होतात आणि अध्यात्म्याच्या दिशेने केलेले संशोधन सुखशांती, समाधान निर्माण करते. या दोन्हीमध्ये जर विकृती निर्माण झाली तर विज्ञानाच्या संशोधनाने शोषण, क्रूरता, व्यसनाधीनता, अस्वास्थ्य वाढते तर अध्यात्मात दंभ, वंचना, अंधश्रद्धा असूया यांची निर्मिती होते. म्हणूनच संतसंगती मानवी जीवनात समाधान निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानता येते पण येथेहि दंभाचा-स्वार्थाचा धोका राहतोच. श्री दासगणूंनी यासाठीच संतसंगतीच्या संदर्भात दंभाचाही विचार केला आहे.

## ॥ संतत्वाला दंभाचा धोका ॥

स्वार्थासाठी जेव्हा एखाद्या चांगल्या साधनाचा वापर केला जातो. तेव्हा तो दंभ ठरतो. एका मर्यादित प्रमाणात हा दंभही समजू शकतो. पण संतत्वाच्या यथार्थत्वाचा विचार न करता वरच्या रुपाकडे पाहून त्याला संत समजले तर आपत्ती येते- नुकसान होते. दंभ कोणत्याही प्रकाराने स्वार होऊ शकतो. एखादा 'भगवान्' व्याख्यानाच्या रुपाने, गोड मधुर भाषेच्या माध्यमाने 'समाधीकडे संभोगातून' जाता येते म्हणून सांगत असेल तर तो भगवान् नाही उलट **'तुका म्हणे ऐशा नरा** --- या जातीतला आहे हे ओळखले पाहिजे. भले भले प्राध्यापकही अशा भगवानाला भुलतात. परमार्थातील अनेक चांगल्या गोष्टींबद्दल विकृत भावना वा अंधश्रद्धा निर्माण होते. ती यामुळेच. म्हणूनच सावधानता ठेवावी लागते.

श्री दासगणूंनी दंभ अनेक प्रकारांनी केला जातो असे वर्णन केले आहे. वर्गण्या करून धर्मशाळा बांधणारे, विवस्त्र राहणारे, केवळ फलाहार करतो असे म्हणणारे धूम्रपानाच्या सवयीने सिद्धी दाखवणारे, नामसप्ते करून उत्पन्न मिळवणारे, आपली महती वाढेल असे कार्यक्रम जाहीरातीने करणारे, हातातून भस्म-कुंकू काढणारे, अनधिकारपणे गुरूमंत्र देणारे इ.इ. एवढेच नव्हे तर दासगणूंनी स्वतःलाही त्यात गोविले आणि म्हटले प्रेमळ कीर्तने करून प्रतिहरि दिनीला पंढरीला जाणाराही पूर्णांशाने संत म्हणता येत नाही. संतत्वाच्या यथार्थ स्वरूपाच्या ज्ञानासाठी त्यांनी ही सारी उदाहरणे दंभाच्या वेगळ्या वेगळ्या संदर्भात उल्लेखिली आहेत आणि ज्यांना खरंच गुरु करायचा असेल त्यांनी गुरुसंबंधीची सर्व माहिती नीट कसून तपासून घेतली. पाहिजे असे ज्ञानेश्वर आख्यानात आवर्जून म्हटले आहे.

बाह्यतः दिसणाऱ्या संतत्वाला ही काही मर्यादित महत्त्व असते. जाहिरात ऐकून मनुष्य औषध घेतो. जाहिरातच खात नाही. बाह्यतः दिसणाऱ्या सर्व संतांच्या स्वरूपाविषयी तेंच ध्यानात घ्यावे. म्हणूनच संत ओळखणे हे फार अवघड काम असते यात शंका नाही.

खरे संतत्व कसे पारखून घ्यावे या दृष्टीने श्री दासगणूंनी आपल्या आख्यान काव्यातून वा संतचरित्रातून निरपेक्षता, अंदाभिकता, सुचिता, सौजन्यता, भूतदया, अहिंसा, अलिप्तता, उपास्यावरील दृढ श्रद्धा, शांती, मार्दव, कर्तव्य तत्परता, निष्ठा, समत्व पवित्रता अशा अलौकिक आंतरिक सद्गुणांची महती गाऊन सांगितले आहे.

खरी भक्ती नि खरा संत हे दोन नाहीत त्यांचा अन्योन्याश्रय संबंध असतो. म्हणून ते म्हणतात, 'त्याचा निश्चय अचल असतो. दुसऱ्याच्या उत्कर्षाने त्याला मत्सर वाटत नाही. त्याचे मन अद्वेष्टे असते. तो दंभाचा त्याग करतो. शुचि मनाने व्यवहार करतो. मन शांत ठेवतो. असा हा मनुष्य पर्यायाने उत्तम भक्ती करतो. या दृष्टीने पुढील पद पहाण्यासारखे आहे -

**''तोच म्हणावा जगि संत ।**
**वस्तित राहुन लोकचारा त्यजि न, धरी परी हेत ॥**





**हेवादेवा नच कवणाचा । जो अवघ्याही मित्र जगाचा ।**
**लाग न जवळी ज्या षडरिपुचा । अतुल अंगि सामर्थ्य ॥**
**जवळ उपाधि नाहि कशाची । आयुपरहित करण्या वेची ।**
**सत्यामाजी न भीड कुणाची । हाच जयाचा पंथ ॥**
**दासगणु म्हणे ऐशा संता-शरण गेलिया मोक्ष ये हाता ॥**
आणि मग

**''जन्म मरण ते चुकवायला पद संतांचे धरी**
**तयांची संगत जाऊन करी ।''**

म्हणूनच भक्तिसूत्रकार नारदांनी संतसंग दुर्लभ, अगम्य आणि अमोघ असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी साधकाने उत्कटता वाढवावी. रामेश्वर भटालाही प्रथमत: तुकोबा कळले नाहीत. म्हणून संतसंगती अगम्य ठरते. मात्र येथे साधकाला निराशा येऊ नये म्हणून तिला अमोघही म्हटलंय. अर्थात संतसंगती व्यर्थ जात नाही ! साधना सातत्याने करणे हेच आवश्यक. वाल्याचा वाल्मिकी होतो. हे संगतीचेच फळ. खेचरांच्या पायांचा संग होताच. सर्वत्र व्याप्त असलेला पांडुरंग श्री नामदेवांना आकलला. यासाठीच नारदांनी संतसंगतीला प्राधान्य दिलं. 'मुख्यतस्तु महत्कृपया' (परमेश्वरदर्शन संतकृपेवाचून अशक्य) त्यानंतर ईश्वर कृपेचा उल्लेख आहे. (भगवत् कृपालेषान वा')

## ॥ संतसंगाने विवेक लाभ ॥

**'बिनुसतसंग विवेक न होई । रामकृपाबिन सुलभ न सोई'** हे तुलसीदासांचे सूत्रही हेच सांगते. राम कृपेतूनविवेक, विवेकातून साधना व साधनेतून ईशदर्शन ! सामान्य जनांना श्री दासगणूंनी संतसंगती आपोआप घडेल असे आश्वासन देत म्हटले आहे की **'कर्मे करावे निवृत्त मन । योगे करावे इंद्रिय दमन । भक्तीने करावा आकलना सगुणरूप परमात्मा ।''** यासाठी त्यांनी **'केलिया श्रवण संत चरित्रे। अवघी निरसन होतील दुरिते '** असा विश्वासू मार्गही सांगितला.

संत तुकाराम महाराजांचा एक इशाराही मोलाचा आहे. संतसंगतीचा न धरावा हव्यास । नसते गुणदोष अंगा येती' आपल्या कल्पनेने एखाद्याच्या ठिकाणी संतत्व असल्याचे आपण ठरवू नये. उलट आपली योग्यता झाली की संतांचा सहवास आपणहून लाभेल असा विश्वास ठेवावा. श्री दासगणू यासाठी संतग्रंथांचा सहवास अवश्य करायला सांगतात. 'वाची हा दासबोध लक्ष लावुनी' असे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या संदर्भात तर ते म्हणतात की ज्याला ज्ञानेश्वरी वाचावीसी वाटते तो भाग्याचा ! ''सबळ पुण्य ज्याचे बुध हो तोच हिला वाची!'' संतांचे हे सारे ग्रंथ त्यांच्या वाङ्मयमूर्ती आहेत आणि साधकाला सर्वप्रकारचे मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य या ग्रंथामध्ये आहे, भगवंताची गीता, ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी, तुकारामाचा गाथा तर रामदासांचा दासबोध-सारेच उत्तम मार्गदर्शक त्यांची संगती आपणास खरा संत गाठून देणारी आहे.

एकदा तुकारामांना देवांनी विचारले, 'तुकोबा पुन्हा एकदा या पृथ्वीतलावर जन्म घ्यायला तयार आहेस का?'' तुकोबा उत्तरले, ''एका अटीवर हं -

'देवा, तुझा विसर पडणार नसेल, वाचेने सतत तुझे नाम येणार असेल आणि संतसंग मिळणार असेल तर ; **'तुका म्हणे गर्भवासी, सखे घालावे आम्हासी'** संतसंगतीचा हा असा लाभ आहे.

संत साहित्याच्या परिशीलनाने, चिंतन-मनानेच संत-सत्पुरुषांच्या भेटीगाठी पडतील यात तिळमात्र शंका नाही. म्हणून साधकाने दैवी संपत्तीच्या सद्‌गुणांच्या आश्रयाने संत वाङ्मयात आपले जीवन व्यतीत करावे.

✿ ✿ ✿

## सत्संग — संत आसाराम बापू

**हे मनुष्य देहामध्ये झोपलेल्या चैतन्य देवा !**
**आता जागा हो.**
**स्वत:ला जाण आणि स्वावलंबी हो.**
**आत्मनिर्भर्ता हाच खरा पुरुषार्थ होय.**

**God helps those who helps themselves**

**जेव्हा तुम्ही स्वत:ला मदत करता तेव्हा ईश्वरदेखील तुम्हाला मदत करतोच. मग दैव (भाग्य) तुमची सेवा करण्यास बाध्य होते.**

**खरोखरच तुम्ही आत्मनिर्भर झालात तर सर्व काही प्राप्त करू शकता. तुमच्यासाठी काहीच असंभव नाही. शाब्बास वीरा ! शाब्बास !! हिम्मत कर. नकारात्मक विचारांना चिरडून टाकून धैर्याने कार्यरत हो !**

✿ ✿ ✿



# संतांचे संगति मनोमार्ग गती !

– सौ. मनोरमा गो. फणसे –

'संतांचे संगति मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे॥' असे संतश्रेष्ठ ज्ञानदेवमहाराज यांनी आपल्या हरिपाठामध्ये म्हटले असून संतसंगतीचे हे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. पण त्यासाठी नेमकेपणाने संत ओळखण्याची दृष्टी मात्र आपणाजवळ असावी लागते. अन्यथा सत्पुरुषांच्या उक्ती-कृतीचे अर्थ न समजल्याने आपण व्यवहारीजगातील हुशार माणसे त्यांना वेडे समजतो. कधी कधी संत परिक्षा घेण्यासाठी सुद्धा वेड पांघरतात. अशाच संत महात्म्यांपैकी फलटणचे डॉ. काका उपळेकर एक होते.

वास्तविक संतांच्या बाबतीत लिहिणं, खरं म्हणजे फार अवघड गोष्ट! पण संतांनीच त्याचं उत्तर देऊन ठेवलं आहे की, आमची कामे बुद्धीच्या पलीकडील असतात' म्हणून ! आणि खरोखरच तसं अनुभवास येत.

नाहीतरी स्वानुभव हाच महत्त्वाचा. नुसतं पुस्तकी ज्ञान कामास येतंच असं नाही. त्यातंही कुठलेही काम आत्मीयतेने, निष्ठेने, कष्टाची पर्वा न करिता केले तर थोडेफार तयारीत आहे, असे म्हटले तर चालेल. पण नुसते तयारीत असून चालत नाही. त्याकरिता हातून कठोर साधना प्रत्यक्ष घडावी लागते आणि साधनेसाठी प्रथम संतांची कृपा संपादन करावी लागते.

संतांची कृपा संपादन करणे, वाटते तितके सोपे नसते. आणि संतसुद्धा पात्रापात्राचा विचार करूनच सांगत असतात. त्यांना पक्क माहित असतं की सर्वसामान्य माणूस जितक्या पोटतिडिकेने भुकेच्या व्यवस्थेसाठी धडपडत असतो, तितक्या व्याकुळतेने देवाकरिता धडपडत नसतो. म्हणून ते स्वत: परम प्रेमाने वेड पांघरून वावरत असतात.

वेड पांघरणे म्हणजे किंमती बहुमूल्यवान महावस्त्रे पांघरणे नव्हे, तर आपले ईश्वरासंबंधीचे आत्मिक ज्ञान मुद्दामहूनच ते कोणापुढे मिरवत, सांगत बसणार नाहीत. म्हणूनच अशा अज्ञानी समाजाला जाग येण्याकरिता संतांची वागणूक म्हणजे बावळा पोषाख, आपल्या दृष्टीने असंबद्ध संभाषण व व्यवहार इतके वेड्यासारखे करीत असणे, म्हणजे आवडीनेच वेड पांघरून म्हणण्यापेक्षा लपेटूनच (म्हणणे योग्य) बसतात.

असे वेड पांघरून बसलेले फलटणचे प.पू.डॉ. गोविंदकाका उपळेकर सर्वांच्याच परिचयाचे अलीकडे-अलीकडे झाले होते. व्यक्ती तितक्या प्रकृति या संदर्भातच बघितले तर सर्व संतांची तऱ्हा आणि आत्मज्ञान सर्वच सारख्या तोलामोलाचे असेच असते व आहे तरीपण डॉ. काकांचे बऱ्याच प्रमाणात वेड पांघरणे जास्तच होते.

## ॥ प्रसिद्धी पराङमुखता ॥

प्रसिद्धी पराङमुख डॉ. काकांच्या सर्व वृत्ति – विकार मुळातूनच बदलले असल्यामुळे त्यांच्या सहवासानीच दु:खीकष्टी जीवांच्या अधिभौतिक-अधिदैविक व अध्यात्मिक व्याधी आपोआप दूर होत असत. जसे म्हटले आहे, **'तव पदा जवळी**





**येता। पुरविशी आस ना मागता।** 'ते कसे काय होते याची जनसामान्यांना जाणीव नसली तरी सिद्ध-संतांना असते व अशी बुद्धीच्या पलीकडली कामे सहज जाणीवेने होत असतात. डॉ. काकांचे सर्वांशी जिव्हाळ्याचे व निरपेक्ष प्रेमाचे नाते भीतियुक्त आदराचे होते.

डॉ. काकांसारखे अध्यात्माच्या उच्च कोटीस पोचलेले संत कधीही चमत्कार करीत नसतात. अशा तऱ्हेच्या स्पष्ट व्यक्तिमत्वाने जगांकडून प्रकृतीशी ऐक्य पावलेल्या (श्रीकृष्ण देवांसारख्या) सामान्यातील असामान्य युगपुरुषाकडून विलक्षण घडामोडी आपोआप घडवितात-करवितात वा व्हावयास लागतात. अशा ब्रह्मनिष्ठ विभूतिंपैकी डॉ. गोविंदमहाराज साक्षात् परब्रह्मच होते. डॉ. काका म्हणत असत की, 'श्री बागोबांनी मला उघडा पाडला. (माझ्या वेडिवेची झलक प्रसिद्धीस आणली.) नाही तर मी इकडचे जग तिकडे केले असते.'

बागोबांनी डॉ. काकांच्या अफाट दैवी सामर्थ्याचा, आत्मविश्वासाचा, बोलबाला केल्यामुळे फलटणी लोकांची वर्दळ वाढू लागली. तो तो डॉ. काकांचे वेडेपण जास्तच वाढू लागले. कधी म्हणावे, 'मला हर्निया झाला, मला मूळव्याध झाली आहे, माझे डोळे पाठीला लागले आहेत,' असे म्हणत पायमोजे, काठी, पट्टा असे सर्व खोलीत 'श्रीकृष्णदेवांच्या गादीजवळ मांडून ठेवीत. येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांना डॉ. म्हणत की, 'मी एक इथे मुर्ख वेडा बसलो आहे, आणखी तुम्ही कशाला येता?' वास्तविक लोकांना त्यांचे वेडेपणच भावत असे. वेड पांघरलेल्या त्या पू. काकांना ज्या लोकांनी समक्ष पाहिलं, त्यांना तेच डॉ. काका फार आवडत असत. कारण त्यांची ती मूर्ति फारच लोभस-निरागस-प्रेमळ-सहजसुंदर दिसत असे. त्यांच्या मुखावरील हास्य तर बेमालूम गोड ! असे की जर येणाऱ्या लोकांना अध्यात्म कळले नाही तरी या व्यक्तीपासून या खोलीतून बाहेर जाऊच नये, असे वाटत असे. तहान-भूक हरखून जात असे. पू. डॉ. काकांचे ते मूक हावभाव बघून सर्वांना काहीच कळत नव्हंते, पण एखादा शब्द ते केव्हा महत्त्वाचा बोलतील ते सांगता येत नसे. अशी 'वेडिवे माजी' दडलेली ही मूर्ति खरोखरीच 'वेडी' होती का? असा अजूनहि संभ्रम पडतो. पण तीच मूर्ति ब्रह्मदेवाच्या बुद्धीच्या पलीकडील होती.

**'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति'** याच तत्त्वावर पू. काकांचा जास्त भर असल्यामुळे त्यांचे मर्मभेदक बोल आठवले की आता- आता जरासा त्याचा उलगडा होतो. कधी कधी अगदी व्यावहारिक बोलावे तर कधी एकदम म्हणाले की, 'संत दगड-धोंडे सुद्धा पचवतात' ज्याला जसा अर्थ भावेल, तसा त्यांनी लावून घ्यावा. क्षणात ब्रह्मानंदी तल्लीन तर क्षणात व्यावहारिक. असे डॉ. काका सांगायचे तर मोठेच कोडे! ते उलगडणे म्हणजे टिटवीने महासागर उपसण्यापैकीच होणार. पण त्यांनी जशी बुद्धी दिली तसेच सागर उपसत जायचे, म्हणजे उपसता-उपसता कधीतरी केव्हातरी मोत्याचा शिंपला हाती लागलेच लागेल. आणि ते अध्यात्मिक मोती कसे-कोठे व केव्हा वापरायचे ते त्यांनाच समजणार!

सर्वांचे दु:ख हरण करून सर्वांना सुखाची ऊब देऊन परत आम्ही काहीही केले नाही म्हणून अहंकार विरहित बाजूला होणार. मोठेपणापासून फार दूर होणार. कारण केलेल्या सत्कार्याचे महिमा होऊ नये व त्याची उपाधि लागू नये. या (महिमाभेणे) भीतीने सदैव ते जनसमुदायापासून अलिप्त राहात. परंतु जनकल्याणाच्या तळमळीने जाता जाता सहज गोष्टी करीत आणि वर म्हणत 'मी कोण करणार ?' आपण म्हटलेले त्यांना आवडत नसे. मग महाराज म्हटलेले तर कसे आवडणार? त्यामुळे आयुष्यभर ते लोकांचे प्रेमळ काकाच राहिले. आपणच संतांच्या सान्निध्याला कमी पडतो. ते भरभरून देण्यास तयार असतात. पण आपली बघायची दृष्टी बारकाव्याची पाहिजे व इथे काही तरी अद्वितीय सामर्थ्याची बूज राखली पाहिजे ही जाणीव अंशत: तरी पाहिजे.

पू. डॉ. काकांना बडेजावापेक्षा अंतरीची, जिव्हाळ्याची, भगवंताची भक्ती आवडे. पू. डॉ. काका म्हणत की क्लेशांनी जे काम करायचे ते सहज आनंदाने करावे. शारीरिक, मानसिक क्लेशांनी त्रस्त होऊ नका, तर निर्लेप मनाने, सहज वृत्तीने देवाला आपलासा करा. याचे सहज उदाहरण म्हणजे झाडाची कैरी सहज वाऱ्याने पडली तरी ती उचलून आणून श्रीकृष्णदेवांच्या गादीवर ठेवत व शंभो म्हणून गोड हसत. इतकी ती सहज व आनंदी वृत्ति बघून आपले हात नकळत जोडले जात असत. मनामध्ये जरा जरी शंकेची जळमटे उमटली तरी काम बिघडते. त्या कैरीला माती लागली असेल का, पक्षांनी चोच मारली असेल का, असे नुसते विचार डोक्यात आले तर कशातूनच समाधानाचे किरण सुद्धा आत येत नसतात. खूष मनाने सर्व कार्य उत्तम होत असते. चरकरणी दिसणारे ते वेड सखोल ज्ञानानी ओथंबत असे. म्हणूनच त्यांची जवळीक हवी हवीशी वाटे, पण जाणीव नेणीवेच्या अवस्था





सारख्या बदलत असल्यामुळे सामान्यजनाची तारांबळच उडत असे. तेथे जातीचे ज्ञान उदयाला आले तरच काहीतरी धडगत असणार अन्यथा रिकामाच – रिकामा !

वास्तविक प. पू. डॉक्टर काकांनी आपले सद्‌गुरू श्रीकृष्णदेव यांची तीनच वर्षे खडतरातली खडतर अशी अत्यंत कठोर सेवा केली, पण आपल्या भक्तांना त्यांनी साधा-सोपा-प्रेमाचा भक्तिमार्ग दाखवला. संतमनाचे केवढे औदार्य !

एकच टॉनिक चाळीस वर्षे काका घेत असत. सामान्य माणसाला साहजिकच वाटे की, एवढे स्वत: संत आहेत तर औषध कशाला? याचे उत्तर काका क्रियेनेच देत असत. याचा उलगडा म्हणजे कोठल्याही चांगल्या गोष्टीचे सातत्याने आचरण पाहिजे. देह धारण केला तर त्याला योग्य उपचार पाहिजे. आणि हे सर्व करताना आत्मतत्त्वांची अलिप्तता ठेवूनच देहाकडे बघणे होत असे. त्यामुळे पंचमहाभूतापासून तयार झालेला देह काय करतो आणि काय नाही, याची ना खंत ना हव्यास. आत्म्याचे वसतिस्थान देह म्हणून पाहिजे तेवढीच त्याची काळजी घेणे; पण हे सर्व न बोलता क्रियेनेच दाखवून देणे.

पू. डॉ. काका फारच कमी बोलत असत. अगदीच आवडता भक्त आला तरच मोकळेपणे गप्पा म्हणतात, तसे होत असे. त्यांचे म्हणणे म्हणजे 'सौ सोनार की एक लव्हार (लोहार) की' असे, सोनारासारखे ठक-ठक करत किती वेळ बसायचे? अशा तऱ्हेचे पू. काकांचे बोलणे कोणालाच सहसा समजत नसे. डोळे किलकिले करून ते आपल्यापाशीच म्हणजे आत्मतत्त्वाशी त्यांचा बराच संवाद चाले. कोणी काय आणले काय नाही इकडे अजिबात लक्ष नसे. तर सतरंजीवर सांडलेली साखर लहान मुलासारखी कणा-कणांनी हाताच्या बोटांनी 'पू. काका' टिपून खात असत. जवळ बसलेल्या मांजरीला सर्वांच्या आधी पेढा देत असत. कारण काय याचा उलगडा कधीच झाला नाही. कधी कधी सर्व पोषाखानिशी टोपी घालूनसुद्धा झोपायचे. उशाखाली आपली सर्व अध्यात्मिक पुस्तके घेऊन.

हे असे सर्व दिनक्रम पाहून साहजिकच लोक 'वेडा' म्हणून दूरच राहात आणि 'पू. काकांना' तेच हवे असे. एकांतप्रियता अतिशय महत्त्वाची, व्यवहारापुरताच व्यवहार असे.

पू. काका अध्यात्मिक तोलामोलाच्या व्यक्तिशी त्याच पद्धतीने अगदी गांभीर्याने सर्व व्यवहार करत. बहुधा आत्मानंदात मग्न असत आणि त्याच अवस्थेत असल्यामुळे त्यांचे सर्वच बोलणे कमाल सत्याला धरून असे आणि म्हणून ते म्हणत की, 'खाली डोके वर पाय अशी माझी अवस्था झाली आहे. आता झेपत नाही पण काय करावे?' असे पू. काका इतर जनांनाच काय सर्वांनाच 'वेडेच' दिसणार पण 'वेडेपणातूनच सदैव' ज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे –

**सूर्ये अधिष्टिली प्राची ।**
**जगा जाणीव दे प्रकाशाची ।**
**तैसी श्रोतया ज्ञानाची ।**
**दिवाळी करी ॥**

ज्ञानाच्या प्रकाशाचीच दिवाळी होत असूनही, इतक्या उच्चकोटीची अवस्था असूनही कधीही नित्य नैमित्तिक कर्मात खंड नाही. ते सर्व वेळेवरच झाले पाहिजे हा कटाक्ष असे. दुपारी बारा वाजता भोजनापूर्वी माऊलीचे लोटांगणातून दर्शन घेऊन बरोबरच्या भक्ताकडे निर्देश करून माऊलीशी संवाद करण्याची अतिशय लाघवी पद्धत होती. आता हे सर्व काहीच दृष्टीस पाहणे मिळणार नाही, ही अत्यंत खंत वाटते. इलाज नाही. जेवढे हृदयी साठवता आले, ते भाग्यच म्हणून स्वस्थ असावे ! दुसरे काय?

असे जरी असले तरी प्रपंचातून परमार्थात आणि परमार्थातून प्रपंचात दोन्ही गोष्टी फारच अवघड आहेत. तरीसुद्धा पू. काका सूना प्रसुतिगृहात गेल्या की, ते त्यांच्या प्रकृतीची चौकशी करीत. बाळ-बाळंतपणीला प्रसुतिगृहात भेटावयास जाऊन ते नातवंडांचे कौतुक करीत असत. धन्य त्या सूना, मुले व नातवंडे. पण केव्हा ! पू. काकांना जाणून घेतले असते तेव्हा ! म्हणूनच म्हणावे लागते की,

**''संतांचे संगति मनो मार्ग गती ।**
**आकळावा श्रीपती येणे पंथे ॥''**

सर्वत्रात असणारा श्रीपती जेव्हा आपणाला दिसेल, भेटेल, तेव्हाच पू. काकांसारख्या संतांना ओळखण्याची पात्रता आपणास निश्चित येईल. तोपर्यंत 'वेडियेमाजी दडे' असेच म्हणत राहणार.

अशी ही वेडियेमाजी दडलेली मूर्ति साक्षित्वाने आता पुन्हा पुढे कधीही दिसणार नाही. डॉ. काकांचे स्मरणात राहावे हेच त्यांचे चरणी सदैव मागणे !

✿ ✿ ✿





# संत सहवासाचे एक स्मरण

स. कृ. देवधर

फलटण पूर्वीचे संस्थानिक गाव या गावांत काका महाराज उवळेकर नावाचे एक सत्पुरुष रहात असत. ज्ञानेश्वर माऊलीवर नितांत श्रद्धा प्रसिद्धीपासून फार दूर, वरून कडक पण पोटांत प्रेमळ लोकांनी आपणास भेटू नये म्हणून ते प्रयत्नशील असत. त्यातून कोणी भेटलाच तर त्याला रागावण्याचा प्रसाद मिळे. म्हणून लोक त्यांचे नेहमी लांबूनच दर्शन घेत आणि ते सुद्धा त्यांना समजणार नाही अशा थाटात. पंढरपूरच्या वारीच्या वेळी अनेक लोक त्यांच्या दर्शनाला उत्सुक असायचे पण त्या काळात ते कुठेतरी जाऊन बसायचे. मला हे माहीत होते म्हणून बरेच दिवस मी देखील त्यांच्या दर्शनाला जाण्याचे टाळत आलो. वेळ यावी लागते तोपर्यंत प्रतीक्षेत दिवस घालवावे लागतात. प्रतीक्षा कधी फोल होत नाही असा माझा अनुभव आहे.

१९७१ साली कार्यालयीन तपासणीच्या निमित्ताने (श्री देवधर सहकार खात्यात सनदी अधिकारी होते) मला फलटण येथे जाण्याचा योग आला. ज्या कार्यालयाच्या तपासणीला मी गेलो होतो त्या अधिकाऱ्यांना मी माझा हेतू सांगितला तेव्हा ते म्हणाले कशाला जाताय त्यांच्याकडे अगोदर ते कोणाला भेटत नाहीत आणि भेटले तर त्यांच्या शिव्या ऐकण्यापलीकडे काही पदरी पडत नाही.

तरीपण एकदा जावे असे मला वाटते. संतांच्या शिव्यामध्ये सुद्धा प्रसाद असतो.

त्यांनी त्यांच्या कार्यालयातील एक कारकून सोबत दिला आणि साधारण संध्याकाळी सहाच्या सुमारास त्यांच्या घरी पोहोचलो. घराच्या बाहेर वाळू पसरलेली होती. काका त्या वाळूवर अनवाणी फिरत होते. मी आवाराचे दार उघडले तेव्हा त्या दाराने केलेली कूरकूर ऐकून दारापासून लांब असलेले काका एका लहान मुलाप्रमाणे दिडक्या चालीने तुरूतूरू माझ्यापर्यंत अगदी वेगाने आले. मी आणि सोबत आलेला कारकून थबकून उभे राहिलो. ते जवळ आले. माझा डावा हात आपल्या उजव्या बगलेत घेऊन ते पडवीकडे वळताना मोठ्याने म्हणाले -

'अहो, काहीतरी गोडधोड करा. माझ्या माहेरची माणसं आली आहेत. त्याचं तोंड गोड करु दे.'

त्यांच्या म्हणण्याचा अर्थ मला कळला नाही. मी आश्चर्यात बुडालो होतो. आम्ही त्यांच्या नेहमीच्या खोलीत आलो. त्यांनी माझा हात सोडला आणि बसण्याची आज्ञा केली. ते त्यांच्या नेहमीच्या बैठकीवर बसले. त्यांच्या जवळ उजव्या हाताला मी बसलो.

बरं झालं मी वाट बघत होतो. माझ्या माहेरची माणसं भेटली म्हणजे असं होतं बघा. (याचाही अर्थ मला कळला नाही.) आपलं दर्शन झालं. बरं वाटलं. मी त्यांना नमस्कार केला. 'मढ्याला कसला नमस्कार करतां. त्या तिला करा. टोपलीभर ओझे झालं तरी ती काही बोलायची नाही.' थोडावेळ गेला वरच्या आढ्याकडं पाहात ते म्हणाले त्या 'सोलापूरच्या माणसाला काही लिहायला सांपडलं नाही. त्यानं आपलं हे मढं कसं आहे. (स्वत: कडे हात करीत) त्याचंच वर्णन केलं, काय म्हणावं या कार्याला (याचा अर्थ लगेच कळला नाही) माऊलीला सोडायचं आणि नको त्याचं धोतर धरायचं. काही खरं नाही.' पुन्हा थोडा वेळ शान्ततेत गेला. माझ्या बरोबर आलेला कारकून निघून गेला. तेव्हा काका उठले. हात वर करून खुंटी हातात धरीत ते मोठ्याने म्हणाले 'हे काय पोरं मिळण्याचं ठिकाण आहे. आला झोकांत पांढऱ्या गाडीतून. म्हणून काय पोरं मिळतात. जा परत जा.' (याचाही अर्थ मला कळला नाही) काका खाली बसले. समोरची ज्ञानेश्वरी उघडली. सर्वत्र अंधार झाला होता. दिवा लावायचं भान कोणालाच नव्हतं. वांचायला दिसत नव्हतं. काका मला सांगत होते - 'माऊली बोलू लागली की आम्ही आमचं तोंड उघडतो आणि कान बंद करतो. मग गोंधळाला काय कमी.' ज्ञानेश्वरीवर हात ठेवीत ते म्हणाले ही माऊली बोलू लागली की माणसानं तोंड बंद करून कान उघडे ठेवावेत . माऊली कानातून खाऊ घालते. ते पोटात नाही जात. ह्या इथं माझ्या छातीला हात लावून म्हणाले, 'इथं जातं. तोंड उघडलं की पोटांत जातं. तिथ किती घाण. घाणीबरोबर चांगलं पण जातं निघून. आता बघा माऊली बोलू लागली. अंगठा आणि तर्जनी यांच्यामध्ये मोठी जागा ठेवून त्यांनी ओवीवर बोटं ठेविली. त्या दोन बोटांमध्ये ओवी होती. मी वाचित होतो - कारण त्या चिमटींतून ओवीवर प्रकाश पडत होता.

**पित्तें मीचि जाहले । मियाचं प्राणे घाले ।**
**जीवो मरो विसरले । बोधाचिया मुली ॥**

ओवी वाचून होतांच काकांनी हात उचलला आता ओवीच काय पण ज्ञानेश्वरी पण दिसत नव्हती. काका बोलू लागले -





'माऊलीच्या पालखीचे भोई. त्यांच्या पायाच्या चिखलांत लोळा. अंगाची सगळी घाण जाते.'

त्याचे शब्द ऐकल्यावर कळलं की मी ज्ञानदेवांचा सेवक आहे. नेहमी आळंदीला जातो. म्हणून त्यांच्या माहेरचा झालो होतो. चहा पिऊन मी कप बाजूला ठेवला तेवढ्यांत कोणीतरी एक गृहस्थ आले. काकांच्या खोलीत दरवाजापाशीच दोन मोठ्या करंड्या ठेवून तो निघून गेला. एका करंडीत हार-फुले आणि दुसऱ्या करंडीत मिठाई होती. अर्धवट चहा पिऊन कप खाली ठेवीत काका उठले आणि तोंडानें - 'आईला शिव्या देऊन काय पोरं मिळतात. चल निघं.' असं म्हणत त्यांनी त्या दोन्ही करंड्या लाथेने भिरकावल्या त्या अंगणात जाऊन स्थिरावल्या. मी पाहिलें बाहेर एक पांढरी अलिशान गाडी उभी होती. एक गुजराथी दांपत्य गाडीतून उतरून काकांकडे येऊ लागलं होतं. त्यांच्या समोरेच त्यांची उडालेली करंडी स्थिरावली होती. काय करावे या विचारातंच ती दोघे आतं आली काका दारातंच उभे होते. त्या दांपत्यावर ओरडत ते म्हणाले -

'इथं काय पोरांचा बाजार आहे. आला मोठा पोरगं मागायला. मार आणखी मार, आईला आणखी मार. शिव्या दे म्हणजे पोरगं होईल जा. आईकडं जा. तिची सेवा कर. पोर काय आकाशातून पडतात जा. निघा.'

ते दांपत्य निघून गेले. मी अवाक् होऊन सर्व पाहात होतो. मागील म्हणण्याचा अर्थ मला कळू लागला होता. काका पुन्हा खाली आपल्या आसनावर बसले मला म्हणाले

''आतां लागलं की नाही माऊलीकडे चित्त. तुम्ही भाग्याचे म्हणून माऊलीची गाठ पडली. भाकऱ्या पाठीशी बांधून आई आई करीत धावायचं कशाला. भेटेल आई. तिला काय कळत नाही. त्याच्या भुकेची भाकरी ह्यानं पाठीवर बांधली आहे. त्याला कशाला हवी आई. **भाकरी पाठीवर बांधून धावणाऱ्यांसाठी माझी माऊली नाही.**''

हे बोलणं चालल होतं. त्यांचा मुलगा एक अंक घेवून आला आणि मला म्हणाला, ह्याच्यात काकांवर लेख लिहिलाय. अंक त्याने माझ्या हाती दिला. सोलापूरच्या माझ्या मित्रांनी काकांबद्दल लेख लिहिला होता. त्या अंकाकडे निर्देश करून काका मला म्हणाले बघा कसं मढ सजवलंय ते (आता मागचं बोलणं मला समजलं)

आठ वाजले होते. काकांना नमस्कार करून मी उठलो, तेव्हा काका म्हणाले, 'यायला विसरू नका बर कां?'

मी बाहेर पडलो. मनात ज्ञानेश्वरांची ओवी घोळू लागली -

**कवणेही विषयीचे । साम्य होणे न रूचे ।**
**संभावितपणाचे । ओझे जया ॥**

कारण या ओवीत साक्षात स्वरुप अनुभवीत मी बाहेर पडलो होतो.

## सत्संग

### ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**बा**ह्य प्रपंच प्रारब्ध उपाधि । त्यांसी त्रासू नये कधी । हीच जाणावी उघड समाधि ॥ सावली मातीत पडली । तिला धुऊन नाही घेतली । तसेंच खरें आहे देहांचे । पण तें संतांनाच साधे ॥ सर्व संकल्प वर्ज्य करून । अवस्था असावी बालकवृत्तीसमान ॥ सतत विवेक अखंड चित्तीं ॥ रामनामी मनोवृत्ति । हेचि तुम्हा परमप्राप्ती ॥ मारुनी खोटी कल्पनावृत्ती । रामनाम अखंड चित्ति । समाधान संतोष शांति ॥ देवासी सर्व करी अर्पण । करी स्वानंदयुक्त परमात्मचिंतन । हीच सिद्ध साधूची खुण ॥ वासना जाळून शुद्ध चित्त । अहंभाव सोडून निभ्रांत ॥ आता मी रामाचा, राम माझा। हें जाणावें पूर्ण ॥

संतसहवास त्याला पाही । जो देहबुद्धि टाकून राही ॥ संतास ठेवा प्रेम । ही संतांची खूण ॥ साधुनें देह ठेवला । तरी सत्तेनें जागृत राहिला ॥ त्याची ठेवावी आठवण । सेवा करावी रात्रंदिन ॥ संतांचा सहवास। याहून भाग्य नाही दुसरें खास । संतचरणीं विश्वास । त्याने भगवंत जोडला खास ॥ लक्ष ठेवावे संतांकडे। देह हावाव प्रपंचाकडे । नाम घ्यावें श्वासोच्छ्वास । संत संतुष्ट होईल खास । सांगावे संतास नमस्कार । जो जगताचा आधार ॥ संताच्या देहाची प्रारब्धगति संपली। काया आज दिसेनाशी झाली । परि अजरामर राहिली ॥ राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगांत संत ऐसे वर्तती । जेणे दुसऱ्यास मार्गदर्शक होती ॥ संतांचे करावे अनुकरण। घ्यावें त्यांचे दर्शन । सांगावें आलों आहे आपण । विचाराव्या कठिण वार्ता । जेणें सुलभ होईल व्यवहारी चालतां । रामापसा नाहीं लाभ । हें धरले ज्यानें चित्तीं । त्यास लाभली खरी संतांची संगति ॥ त्यांचा आदर्श ठेवावा पुढे । कधी न होईल वाकडें ॥ स्वत:चे पावावे समाधान । त्याने लोकांस आणण्याचा प्रयत्न करावा जाण ॥ संताशी व्हावे अनन्य शरण । दुसरीकडे जाण्याचं नाही कारण । भाग्यानें संत घरी आला । अभागी न माती त्याला। सूर्याचा प्रकाश झाला । आंधळ्याला उपयोगी नाही आला। तैसी विषयी झाली ज्याची वृत्ति । संताची संगत त्याला न लाभती ॥ रामनामावाचून ज्याचा वेळ जात नाही । तोच जीवनमुक्त पाहीं॥ देहाचे ठिकाणीं विरक्त । विषयाचे ठिकाणी नसे अहंममत्त्व । त्याला म्हणतात मुक्त ॥





# सुनि आश्चर्य करे जन कोई। सत्ससंगति महिमा नहिं गोई॥

## संत तुलसीदास -

**हिंदी भाषिकांमध्ये ज्यांचे काव्य घराघरात गायले जाते अशा गोजन संत तुलसीदास यांनी 'सत्संगती' चा महिमा वर्णन करणे अशक्य आहे असे म्हणत म्हणत संत्संग महती सांगितलेली आहे.**

भगवान बुद्ध एके दिवशी अरण्यामध्ये भ्रमण करीत असता त्यांची भेट डाकू अंगुलीमाल याच्याशी होते. तुझ्या हाताचीं बोटू कापून त्या बोटांची माळ मी माझ्या गळ्यात घालणार आहे मुकाट्याने हात पुढे कर.' असे डाकू बुद्धांना धमकावितो. शांतीसागर भगवान बुद्ध या धमकावणीने किंचितही विचलीत होत नाहीत. ते म्हणतात - 'ठीक आहे, प्रथम तू एक काम कर त्या समोरच्या झाडाचे एक पान तोडून आणून मला दाखव आणि मग खुशाल माझी बोटे तोड.'

बस्स ! एवढे किरकोळ काम? आत्ता तोडून आणतो म्हणत तो रांगडा डाकू झाडांजवळ जातो व एक फांदीच तोडून बुद्धांपुढे आणून ठेवतो.

त्या फांदीवरील एक पान अलगदपणे भगवान तोडून घेतात. व फांदी डाकूच्या हाती देत म्हणतात - जा. आता ही फांदी त्या झाडावर जशीच्या तशी लावून ये'.

'आता ती फांदी झाडाला कशी चिटकेल? वेडे की शहाणे? एवढे साधूमहाराज दिसताय अन् फांदी झाडाला पुन्हा चिटकत नाही हे सांध माहित नाही? असा प्रश्न करीत डाकू प्रश्नार्थक मुद्रेने बुद्धांकडे पाहतो.

या त्यांच्या प्रश्नाचा धागा पकडून भगवान बुद्ध त्याला जवळ बसायला सांगतात व समजावणीच्या सूरात प्रश्न करतात. 'ही फांदी होती तशी तुला चिकटवता येत नाही तर मग तुला ती तोडण्याचा अधिकारच काय? ज्याला पुन्हा जन्म देता येत नाही त्याला मारण्याचा अधिकार आपणाला आहे काय?'

भगवान बुद्धाच्या या प्रश्नाने डाकूच्या मनात विचारचा लख्ख प्रकाश पडतो व आत्मपरिक्षणाने पश्चात्ताप दग्ध होऊन भगवान बुद्धाला शरण जातो. लोखंडाला परिसाचा स्पर्श होता क्षणीच त्याचे सोने व्हावे असे परिवर्तन डाकूच्या मनात होते. अशा प्रकारे संतसंगाने क्षणार्धात डाकू सारख्याचीही हृदयपरिवर्तने हातात, सामान्य श्रद्धायुक्त माणसाचे जीवन कृतार्थ होईल यात आश्चर्य ते काय?'

म्हणून 'रामचरित्र मानस' मध्ये संतकवि तुलसीदासजी म्हणतात -

**सुनि आश्चर्य करे जन कोई।**
**सत्संगति महिमा नहि गोई॥**

अशा प्रकारे संत संगाचा महिमा अपरंपार आहे.

✿ ✿ ✿





# प्रपंच आणि परमार्थ

**– डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे –**

**संतांचे साहित्य हे संसार असार आहे असे पलायनवाद सांगणारे साहित्य नाही तर संसार कसा परमार्थरुप करावा हे शिकविणारे साहित्य आहे. संसाराचे नेमके व खरे सार सांगणारे साहित्य म्हणजेच संत साहित्य होय. याविषयी नगरच्या महाविद्यालयातील नामवंत प्राध्यापक व संतसाहित्याचे अधिकारी अभ्यासक डॉ. सहस्त्रबुद्धे यांचा चिंतनात्मक लेख –**

परमेश्वर, प्रेम, आनंद, सौंदर्य, ध्येय या कल्पना व्यक्तिपरत्वे बदलत आहेत असे वरवर पाहता कोणासही वाटते. ते स्वाभाविकही आहे. या संबंधाने अनेक वाद झालेले दिसतात. मूर्त की अमूर्त''एक की अनेक' 'व्यक्तिगत की वस्तुगत', 'निर्गुण की सगुण', 'निष्काम की सकाम', 'सापेक्ष की निरपेक्ष' असे अनेकपरीने हे वाद युगानुयुगे सुरूच आहेत. हे वाद न संपणारे आहेत, की माणसाचे आकलन मर्यादित असते? या संबंधाने जसजसा विचार करीत निघावे तसतसे गुंत्यात सापडलो की काय असे वाटू लागते.

शरीर, आत्मा आणि मन ज्या कर्ममय अवस्थेत गुंतते तेथे वरील कल्पनेची प्रचिती येते. मात्र हे गुंतणे निखळ, निरपेक्ष असले पाहिजे! अशी कर्ममय अवस्था माणसाला प्राप्त होते का? पुन्हा सत्कर्म, सुकर्म अर्थात पुण्यमय कर्म आणि दुष्कर्म अर्थात पाप यांचे न्य? यांपैकी कोणत्याही प्रकारच्या कर्ममय अवस्थेत माणूस रममाण होणे शक्य आहे. काही लोक म्हणतील पुण्य आणि पाप ह्या सापेक्ष गोष्टी आहेत. अध्यात्ममार्गात काय किंवा ज्ञान मार्गात काय अथवा विज्ञान मार्गात काय सामुहिक मनाला वाटणारे, विश्वकल्याण साधले जाईल अशी खात्री वाटणारे कर्म म्हणजे पुण्य होय. या पुण्यकर्मालाच परमेश्वर, प्रेम, आनंद सौंदर्य, ध्येय या कल्पना प्रतीत होतात. अशा कर्ममय अवस्थेत चित्त निर्लेप व शांत असते. मनाला ज्ञानमयतेची डूब मिळालेली असते. ही कर्ममय अवस्था प्राप्त होणे आवश्यक होय.

## ॥ श्रेयाचा ध्यास ॥

अशी कर्ममय अवस्था प्राप्त होण्यास श्रेयाचा ध्यास लागला पाहिजे. ते श्रेय हेच जीवन सर्वस्व वाटू लागले पाहिजे. तसे झाले की श्रेय गाठण्यासाठीचे प्रयत्न हे कष्ट वाटत नाहीत ते प्रेयस कर्म वाटते. संसारातील सारता ती हीच. हीच परमेश्वर प्राप्ती. हीच प्रेम, आनंद, सौंदर्य प्राप्ती होय. श्रेयाचा ध्यास लागला की मन मनस्वी बनून यत्नरंगी रंगून जाते. सतांना संसारातील सुखदु:खाचे फेरे ही क्रीडा वाटू लागते. मौजेचा विषय वाटू लागतो. संसाराची सफलता ही ऐहिक, तात्कालिक सुखदु:खावर अवलंबून न राहता निष्कामपणाने 'तत् सत् ब्रह्मार्पण' बाण्याने आपण जगु शकतो आहोत याची एक बेभानपण (खऱ्या अर्थाने ज्ञानभान) त्यांना आलेले असते. म्हणूनच पाखरांनी शेतखाऊन जाणे, स्वत:चे मूल स्वत:च्याच पायाखाली चिखलात तुडविले जाणे, विंचवाने वारंवार हाताला डंख मारणे, असे सर्व प्रकार घडत असतांनाही सुखाचा, आनंदाचा, चैतन्य रुपाचा अनुभव घडत असल्याची जाणीव संतांना होत राहते. संत, तत्त्वज्ञ, ऋषी, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत एव्हढेच काय परंतु सामान्य निखळकर्ममार्गी या श्रेयाला स्वत:ला झोकून देऊन मोकळे झालेले दिसतात. एखादा आर्किमिडीज 'युरेका युरेका' कसे ओरडत नग्नावस्थेत भर राजदरबारात पळत येतो. एखादा पाणिनी लग्नादिवशीच पत्नीचा त्याग करून अभ्यासार्थ निघून जातो, एखादा बाबा आमटे कुष्टरोग्यांच्या हाताने नंदनवन फुलविण्यात रमून जातो. एखादा देशभक्त प्राणपणाने लढता लढता हासत छातीवर गोळ्या झेलतो. याचे कारण ते श्रेय त्यांना प्रेम वाटते. त्या श्रेयासाठीची कर्ममय अवस्था म्हणजे परमेश्वर, सौंदर्य, आनंद, प्रेम, ध्येय असा त्यांना अनुभव येतो. या श्रेयाला अर्थात परमेश्वर, सौंदर्य, आनंद, प्रेम, ध्येय. यालाच संत सगुणरूपात पाहून त्याचे नामसंकीर्तन करतात. त्या श्रेयात मग्न होणे म्हणजे सर्वसुखाने परिपूर्ण होणे असे त्यांना वाटते.





''सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति ।
रखुमाईच्या पति सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देई मज प्रेम सर्व काळ ॥
विठो माऊलिये हाचि वर देईं ।
संचरोनि राहीं हृदय मार्जी ॥
तुका म्हणे कांही न मागों आणिक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥''

हा तुकारामांचा अभंग केवळ सगुणोपासनेचा प्रकर्ष नाही तर मानवी जीवनव्यवहारातील पुण्यमय मार्गाच्या अवलंबनाचा परवल आहे. निष्काम कर्मयोगाचा पाठ आहे. ''वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा'' यातील वेदांचा अर्थ साध्या प्रापंचिक व्यवहारातून स्पष्ट केला आहे.

जीवन साफल्य माणसाच्या मनातील सौंदर्य, चैतन्य, प्रेम, आदर्श, ध्येय, परमेश्वर त्याला सतत प्रतीत होत राहावे असेच प्रत्येकाला वाटत राहणे स्वाभाविक आहे. त्या तत्त्वाशी अद्वैत होणे हाच परमसुखाचा सोहळा. तेच जीवन साफल्य. तोच जगण्यातला अर्थ- तुकाराम महाराज वरील अभंगात विठ्ठलाकडे मागणे मागतात. विठ्ठल या सगुणरूपात तुकारामांच्या मनातील चित्तत्त्व, परतत्त्व, सौंदर्य, प्रेमभावना, ध्येय (नाव काहीही द्या!) त्यांना सतत मनात स्फुरावे असे वाटते. प्रपंचातील माणसाची सर्व धडपड त्या सुखसोहळ्यातच असत. म्हणूहनच माणूस दुसऱ्यासाठी जगतो असा अनुभव त्याला सुखावतो. आपल्या अंत:करणातील प्रेमभावना, सौंदर्यभावना, ध्येयपरता दुसऱ्यासाठीच्या धडपडीतून, सेवेतून, कष्ट सोसण्यातून सगुण रुपात आल्याचा अनुभव त्याला येतो. हीच त्याच्या मनाची निर्लेपिता, हीच त्याच्या मनातील पुण्यभावना, हीच त्याच्या मनातील सगुणभक्ती !

माणसाची सामाजिकता, सामूहिकता ही अशी त्याच्या परमेश्वरभावनेतून, सौंदर्यभावनेतून, ध्येयपरतेतून जन्माला येते. म्हणूनच सामाजिकतेला योग्य वाटते ते पुण्य ठरते आणि तेथे जे अयोग्य ठरते ते पाप ठरते. माणूस युगे या अद्वैताचा सुखसोहळा अनुभवतो आहे. परंतु व्यापतापसंसार भोग, वासना यात त्याला या आपल्या स्वत:च्याच निष्काम कर्मभावनेचा विसर पडतो. म्हणून प्रतीकरूप परमेश्वराला शरण जायचे. त्याचे नामस्मरण करावयाचे. त्याची अनन्य भक्ती करावयाची. पत्थराच्या मूर्तीत चैतन्यरूप पाहण्याची ही किमया हा माणसाचा केव्हढा सांस्कृतिक ठेवा. त्याची जपणुक हे केव्हढे भाग्य. त्यासाठी त्याग भावना ही परमशांतीची वाट.

## ॥ प्रपंच परमार्थरूप व्हावा. ॥

येथे एक मार्मिक प्रश्न विचारता येण्यासारखा आहे. मोक्ष, मुक्ती परमधाम, अंतिमसुख, जीवनमुक्तता आणि परमेश्वर प्राप्ती ह्या गोष्टींसाठी संत, मुमुक्ष धडपडत असतात. ऋषीमुनी तप:साधना करीत असतात असे म्हटले जाते. संतांची सगुणभक्ती काय सूचविते? प्रपंच्यात राहून असे अंतिमसुख अनुभवता येईल का? वरील सर्व चर्चेत खरेतर या प्रश्नाचे उत्तर सूचित झाले आहेच. प्रपंची माणसाला सर्व संत महंतांन प्रपंचात राहून हा प्रेमसोहळा अनुभविता येईल अशी स्पष्ट ग्वाही दिली आहेच. कदाचित संतांना व अन्य सर्व ज्ञानी महामानवांना साधनापूर्वक ज्ञान प्राप्त झाल्यावर या ज्ञानप्राप्तीसाठी विजनवासाची आवश्यकता नसल्याची खात्री झाली असावी. त्यांना अंतिमज्ञानाच्या प्रसंगी एकच निखळ मार्ग सापडला तो म्हणजे त्याग. त्यागातच सारे सुख, सौंदर्य, प्रेम इ. भरलेले आहे. हा त्याग ज्ञान साधनेसाठी किंवा आत्मसाधनेसाठी केल्यानंतर ते परमआत्मतत्त्वच विश्वातील विविधरुपात नटल्याचा साक्षात्कार झाला. या विविध रूपात ते तत्त्व पाहून त्यासाठी स्वत:ला वाहून घेण्याने हा प्रपंच परमार्थरूप वाटू लागतो. म्हणूनच निष्काम कर्म योग सांगितला. अन्य भक्तीमार्गात संतांनी परोपरीने हाच निष्काम कर्मयोग सांगितला. गोराकुंभार, सावतामाळी, ही संताची उदाहरणे या दृष्टीने बोलकी आहेत आणि मायेतही परमार्थाचा अर्थ भरला. **'ते नाम सोपे रे' असे म्हणत संतांनी काम करता करता कर्ममय अवस्था होण्यासाठी परमतत्त्वाचे स्मरण करावयास सांगितले. प्रत्यक्ष काम हे त्या परमेश्वराचे रूप आहे, त्यात अवघ्यांचे कल्याण आहे, त्या कर्मपरतेने सहज सुखप्राप्त होते असे वाटू लागले की काम कर्तव्य होते, श्रम नाहिसे होतात. 'स्व' चे आणि इतरांचेही कल्याण करण्याचा पुण्यमय मार्ग खुला होतो!**

संतसाहित्याचा साहित्यसौंदर्य आणि भक्तिवाङ्मय या दृष्टीने अर्थ लावत असताना वरील कर्ममयतेचा, त्यागमयतेचा, निष्काम कर्मभावनेचा सांगितलेला मार्ग अनुभवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक वाटते. संतांनी टाळकुटे बनून स्वप्नरंजनात्मकतेने जगण्याचा मंत्र दिलेला नसून.

**'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥''**

असे सांगून ''प्रपंच करावा नेटका । मग साधावा परमार्थ ॥ असा सरळ मार्ग सांगितला आहे. वरील दोन्ही उक्ती या कर्ममयअवस्थेचे नेमके मार्गदर्शन करणाऱ्या ओहत. अशा कर्ममय साधनेचे फलित म्हणजे संसारातील सौंदर्य, प्रेम, ध्येय, परमेश्वर यांचा साक्षात्कार संतसाहित्य हे संसार असार' सांगणारे साहित्य नाही तर संसारातील सारसर्वस्व सांगणारे साहित्य आहे. संतकृपा प्रापंचिकांच्या दृष्टीने म्हणून अतिमहत्त्वाची आहे. सुखदु:खांना, लाभालाभांना परमार्थाने भारून मानवी मनाला शांत करणारी आहे. परमेश्वर, प्रेम, आनंद, सौंदर्य, ध्येय यांचा कर्ममयतेतून अनुभव घडविणारी आहे. असते.

पुस्तक परिचय

विद्यानंद

# 'गीतादर्शन' चा संग्राह्य अंक

पुण्याचा सदाशिव पेठेमध्ये 'गीताधर्म मंडळ' या नावाची सांस्कृतिक संस्था गेली अनेक वर्षे प्रबोधन कार्यामध्ये रत असून या संस्थेतर्फे **'गीतादर्शन'** नावाचे वाचनीय- संग्राह्य असे मासिक प्रकाशित करण्यात येते. ही गोष्ट बहुतेक जिज्ञासू वाचकांना परिचित आहे. 'गीतादर्शन' या मासिकाच्या प्रकाशनाचा उपक्रम संस्थेतर्फे गेली २५ वर्षे मोठ्या जिद्दीने चालविलेला आहे. त्याबद्दल संस्थेचे करावे तेव्हढे कौतुक थोडेच आहे. कारण आजकाल साप्ताहिक-पाक्षिक-मासिक चालविणे ही गोष्ट वाटती एवढी सोपी राहिली नसून त्यामुळेच अनेक नियतकालिकाचा बघता बघता अस्त झाल्याचे आपणपाहतो. साप्ताहिक 'माणूस' सारखे वैचारिक साप्ताहिक अनेक वर्षाच्या वाटचाली




नंतर बंद पडते ही चालकांची नव्हते तर वाचकांची शोकांतिका आहे असे वाटते. असो. अशा बिकट वाटेवर चालत 'गीतादर्शन' ने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले आहे, पुढील वाटचालीस आमच्या सहर्ष शुभेच्छा.

'गीतादर्शन' चा डिसेंबर ९५ चा अंक आजच पोस्टाने मिळाला असून **'गीता-रत्नमाला'** असा या अंकाचा विषय आहे. आपणास 'गीता'. एकच माहिती आहे, ती म्हणजे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास रणांगणावर सांगितलेली. पण त्या श्रीमद्‌भगवद्‌गीते शिवाय अन्य सुमारे १०० गीता आहेत. त्यापैकी खुद्द महाभारतामध्येच ३२ गीता आहेत, भागवतादी पुराणात वेगवेगळ्या ३१ गीता आहेत तर इतर ग्रंथामध्ये ११ गीता आढळतात. शिवगीता, रामगीता, गुरुगीता, उत्तर गीता, हंसगीता, ब्रह्मगीला, गणेशगीता, यमगीता, कौशिकगीता ही त्यापैकी कांही गीतांची नावे आहेत. त्याशिवाय काही गीतांची संदर्भ म्हणून काही ग्रंथात नावे आढळतात पण त्या गीताची हस्तलिखिते वा काही ठोस प्रमाणे उपलब्ध झालेली नाहीत. उदा: अध्यात्म गीता, ओंकार गीता इत्यादी.

'गीतादर्शन' चा डिसेंबरचा 'गीता रत्नमाला' हा अंक या सर्व गीतां ची थोडक्यात माहिती देणारा असून या गीता कोणत्या ग्रंथात, कोणत्या अध्यात, कोणत्या खंडात आलेल्या आहेत याची तपशिलवार माहितीही देण्यात आलेली आहे. गीता अभ्यासकांनी - जिज्ञासू वाचकांनी आवर्जुन वाचलाच पाहिजे. संग्रही ठेवला पाहिजे असा हा अंक आहे.





पुस्तक परिचय

विद्यानंद

# ज्ञानदेवांची सार्थ अंभग गाथा भाविकांना पर्वणी

ये मऱ्हाठीचिये नगरी ।
ब्रह्मविद्येचा सुकाळू करी ।

संत ज्ञानदेव महाराजांच्या ग्रंथसंपदेच्या अलौकिक अशा कार्याचेच हें सार्थ वर्णन असून ज्ञानदेवांची ग्रंथसंपदा हे मराठी मनाचेच नव्हे तर अवध्या मानव जातीचे भूषण आहे. ज्ञानदेवांचे लेखन म्हणजे केवळ काव्य नव्हे, तर **'काव्य नव्हे हा अमृतसंचय।'** असे त्याचे भावरुप आहे. त्या अमृतावरच मराठी भाषेचे-मराठी संस्कृतीचे सारे मोठेपण पोसलेले आहे.




यंदाचे वर्ष (नोव्हेंबर ९५ ते नोव्हेंबर ९६) संत ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीचे सप्तशताब्दीचे वर्ष असून हे वर्ष साजरे करण्यासाठी अवध्या महाराष्ट्रभर विविध उपक्रमांना उधाण आलेले आहे. **'विश्वोद्धारक संत वाङ्मय प्रकाशन प्रतिष्ठान'** या संस्थेने या वर्षाचे निमित्त साधून संत ज्ञानदेवांच्या अभंग गाथेचा **ह. भ. प. हरिभाऊ आनंदा पाटील** यांच्याकडून अर्थ लिहून घेऊन, 'सार्थ अभंग गाथा' प्रकाशित करण्याचे सेवाकार्य केलेले आहे. सुमारे ६०-७० वर्षापूर्वी ह.भ.प. विनायक महाराज साखरे यांनी अशा प्रकारची ज्ञानदेवांची सार्थ अभंग गाथा प्रकाशित केली होती पण ती अलिकडे नवोदित अभ्यासकांना भक्तांना मिळणे दुरापास्त झाले होते. विश्वोद्धारक संत वाङमय प्रकाशन प्रतिष्ठान व ह.भ.प. हरिभाऊ पाटील यांनी भाविक जिज्ञासूंची ती अडचण दूर करण्याचे फार मोठे पुण्यकर्म केलेले आहे. सुमारे ७५० पानांचा हा ग्रंथ केवळ १०० रुपयात उपलब्ध करून देऊन या संस्थेने मौलाचे कार्य केलेले आहे. या कामी ह.भ.प. भगवानराव मुळकें यांनी संस्थेला आपलेपणाने जे सहकार्य दिले, त्या सहकार्यामुळेच आज ज्ञानदेवभक्तांना-भाविकांना-अभ्यासकांना-जिज्ञासूंना ऐन ज्ञानदेवसमाधी सप्तशताब्दी वर्षात 'ज्ञानदेवांची सार्थ' गाथा मिळण्याचा महायोग लाभलेला आहे. ही एक पर्वणीच आहे.

विद्यानंद








*'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली ७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी इंग्रजी आणि मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे; असे अनेक मान्यवरांचे मत आहे.*

*'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय.*

## अभिप्राय

**श्री. मा. कार्यकारी संपादक साहेब,**

श्री साईलीलाचा पुण्यतिथी (दसरा) विशेषांक वाचून अत्यंत समाधान वाटले. हा अंक म्हणजे साईभक्तां मध्ये साईबाबा संस्थान कारभाराबद्दल जो गैरसमज पसरविण्यास येत आहे त्यास समर्पक उत्तर देणारा आहे. चेअरमनसाहेबांच्या मुलाखती वरून त्याबाबत स्पष्ट खुलासा होतो. आपण फारच चांगली मुलाखत घेतली व मा. अध्यक्ष यांनी ही चांगली उत्तरे दिली आहे.साईबाबा संस्थानचा कारभार हा लोकशाही पद्धतीने कसा चालतो आहे. हे साईभक्तांच्या निदर्शनास आणून दिले आहे, अशाच मुलाखती घेऊन आपण प्रसिद्ध केल्यास साईबाबा संस्थान कारभाराबद्दल गैरसमज दूर होतील. आपला हा अंक अत्यंत वाचनीय आहे. 'साईलीला', अंकास असे स्थैर्य लाभो व साईबाबा संस्थान कारभार भक्तापर्यंत जावो हीच साईबाबा चरणी प्रार्थना मा. अध्यक्ष साहेबास धन्यवाद.,

आपला,

**भिमाशंकर खांबेकर**

# लेखक-कवी आणि भक्तांना नम्र निवेदन

लेखक-कवी आणि भक्तांनी आपले लेख-कविता-अनुभव 'श्री साईलीला'साठी जरुर पाठवावेत. त्यांचे सहर्ष स्वागतच आम्ही करु. परंतु ते साहित्य पाठविताना खालील सूचनांचे पालन करावे ही विनंती—

★ लेख-कविता या अध्यात्मिकपारमार्थिक विषयावरच असणे आवश्यक आहे. सामाजिक विषयाचा उद्देश उद्‌बोधक व समाजहितैषी असेल तरच त्याचा विचार होईल.

★ लेख-कविता-अनुभव हे कागदाच्या एकाच बाजूस पुरेसा समास सोडून लिहावेत. पाठपोट लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

★ लेख-कविता-अनुभव यांची हस्तलिखित वा टंकलिखित मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्सप्रत पाठवू नये.

★ अनुभव कथानामध्ये ते श्री साईबाबांशी संबंधितच असावेत. तसेच ते इतरांना वाचण्यासारखे असावेत. अत्यंत खासगी स्वरुपाचे अनुभव पाठवू नयेत. अनुभव कथनाचे लेखन विज्ञानयुगाचे भान ठेवून केले जावे.

★ कोणतेही साहित्य आमच्याकडून पोस्टेजज खर्च करुन परत पाठविले जाणार नाही तरी आपल्या साहित्याची एक प्रत स्वतःकडे जरुर ठेवावी.

★ साहित्य मिळाल्याची पोच, ते मिळताच पाठविली जाते आणि योग्य मजकूर नजिकच्याच अंकात प्रसिद्ध केला जातो.

★ लेखासमवेत आवश्यक ते फोटोग्राफ-चित्रे जरुर पाठवावीत.

**संपादक**
**'श्री साईलीला'**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

Registered with the Registrar
of News-papers of India
No. MH/527

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्‌चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्‌चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्‌चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्‌चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्‌चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्‌चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्‌चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |